मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १८१ ■ मंगळवार, १० मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# शासकीय योजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी शासन प्रयत्नशील : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** जागतिक महिला दिन आणि समाजसुधारक डॉ.मुत्थुलक्ष्मी रेड्डी यांच्या विधानमंडळ सदस्यत्वाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'विकसित भारत नारी शक्ती संगम' ग्रामीण महिला नेतृत्व परिषदेत महिलांना अधिकाधिक संधी दिल्यास सक्षम नेतृत्व घडते, यासाठी शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मीरा-भाईंदरजवळील उत्तन येथे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम) यांच्या संयुक्त विद्यमाने 8व 9मार्च 2026 रोजी 'विकसित भारत नारी शक्ती संगम' या दोन दिवसीय ग्रामीण महिला नेतृत्व परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे, पद्मश्री पोपटराव पवार, प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक अभिराम घड्याळपाटील, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, मीरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, अपर तहसिलदार निलेश गौड आदी मान्यवर उपस्थित होते.




यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढणे ही काळाची गरज आहे. महिलांना योग्य संधी दिल्यास त्या प्रभावी नेतृत्व घडवू शकतात आणि समाजाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. शासनाच्या विविध योजनांद्वारे महिलांच्या सक्षमीकरणाला चालना दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. 'लखपती दीदी' योजनेंतर्गत यावर्षी 37लाख महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले असल्याची माहिती त्यांनी दिली. उद्योग आणि स्टार्टअप क्षेत्रात महाराष्ट्रातील महिलांनी देशात अग्रक्रम मिळवला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

परिषदेत देशभरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या सुमारे 500 ग्रामीण महिलांचा सहभाग असून, व्यवसाय, उद्योग, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या यशस्वी वाटचालीचे अनुभव या व्यासपीठावरून मांडले जाणार आहेत.

यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त करताना, महाराष्ट्रातील निवडून आलेल्या तसेच भविष्यात निवडून येणाऱ्या महिला सरपंचांसाठी प्रशिक्षण शिबिरे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे आयोजित करण्यात यावीत, अशी सूचना केली. यामुळे सुशासनाला चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले.

परिषदेचे प्रास्ताविक प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी केले. पद्मश्री पोपटराव पवार यांनी स्वागतपर भाषण केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक अभिराम घड्याळपाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

यावेळी विधान परिषद सदस्या रेखाताई महाजन तसेच मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर डिंपल मेहता यांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती.या परिषदेत ग्रामीण महिलांच्या नेतृत्व विकास, उद्योजकता आणि सामाजिक परिवर्तनातील योगदानावर विविध सत्रांमध्ये चर्चा होणार असून, काही विशेष महिलांचे प्रेरणादायी अनुभव कथनही सादर करण्यात येणार आहे.

## नऊ वर्षीय मारूफ व दहा वर्षीय मरियम चा पहिला रोजा पूर्ण

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** बीड येथील रहिवासी मुजफ्फर खान यांचा मुलगा मारूफ मुजफ्फर खान(वय वर्षे ९)व मुलगी मरियम मुजफ्फर खान (वय वर्षे १०)यांनी अत्यंत लहान वयात आपला पहिला रोजा ठेवून सर्वांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या कृतीतून संयम, आत्मसंयम आणि धार्मिक श्रद्धेचे सुंदर दर्शन घडते. मारूफ व मरियम यांनी दिवसभर कोणती ही तक्रार न करता रोजा पूर्ण केला आणि अल्लाहच्या इबादतीत वेळ घालवला. त्याच्या या प्रयत्नाचे पालक, कुटुंबीय तसेच परिसरातील नागरिकांनी कौतुक केले आहे. कुटुंबीयांचे म्हणणे आहे की मारूफ व मरियम लहानपणापासूनच धार्मिक संस्कार, शिस्त आणि चांगल्या वर्तनाची आवड ठेवतो. इतक्या कमी वयात त्यानी केलेले हे नेक कार्य आमच्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.



मारूफ व मरियम यांचे हे पाऊल आजच्या पिढीतील मुलांसाठी प्रेरणादायी असून, योग्य मार्गदर्शन आणि संस्कार मिळाल्यास मुले लहान वयातही चांगली मूल्ये आत्मसात करू शकतात, हे या वरून स्पष्ट होते.

## लाखनीत महाप्रज्ञा बुद्ध विहारात जागतिक महिला दिन उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रोशन खोब्रागडे/ लाखनी भंडारा :** लाखनी येथील महाप्रज्ञा बुद्ध विहारात ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीमाई आणि मातोश्री रमाई यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या नलिनीताई ढवळे होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की, आजही महिलांची प्रगती अपेक्षित प्रमाणात झालेली नाही. महिलांना समानतेचे अधिकार मिळाले असले तरी अनेक ठिकाणी अन्याय व अत्याचाराच्या घटना घडत आहेत. स्त्रिया सरपंच, अधिकारी, पंतप्रधान, राष्ट्रपती अशा उच्च पदांवर पोहोचल्या असल्या तरी समाजातील अनेक महिलांना अजूनही छळ आणि भेदभावाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे महिलांच्या शक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी समाजाने त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले पाहिजे. महिलांच्या सन्मानानेच राष्ट्राचा पाया अधिक मजबूत होतो, असे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अश्विनीताई भिवगडे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाज निर्माण करण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. महिलांवर अन्याय, अत्याचार व लैंगिक शोषण होऊ नये यासाठी पुरुषांनीही बंधने लादण्याऐवजी सहकार्याची भूमिका घ्यावी. समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि वैचारिक जडणघडणीत महिलांचे योगदान अनन्यसाधारण आहे. महिलांची प्रगती केवळ चूल आणि मूल यापुरती मर्यादित न राहता ती सर्व क्षेत्रात वृद्धिंगत व्हावी, असेही त्यांनी सांगितले.



यावेळी महिलांनी राजमाता जिजाऊ, यशोधरा, सावित्रीबाई फुले आणि रमाई यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाज परिवर्तनासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले. महिलांचे शिक्षण हे समाज सुधारण्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साधनाताई शिंगाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विना डोंगरे यांनी मानले.या कार्यक्रमाला वि. ग. कांबळे, नामदेव काणेकर, सदानंद वासनिक, रमेश भोयर, डॉ. रेवाराम खोब्रागडे, कलाताई गडकरी, सुमनताई काणेकर, कमलताई गणवीर, विद्या डोंगरे, प्रगती नागदेवे, वर्षा तिरपुडे, अक्षरा खोब्रागडे, पल्लवी खिल्लारे, प्रज्ञा गजभिये, संध्या वैद्य, उमा मेश्राम, कविता देशपांडे, संगीता तिरपुडे, वीरांगना वासनिक यांच्यासह अनेक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## पारवा जि.प. कन्या शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर :** पंचायत समिती अंतर्गत असलेल्या पारवा येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी कन्या शाळेत जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारवा ग्रामपंचायतीच्या सरपंचा संगीताताई मडावी होत्या, तर उद्घाटक म्हणून शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा उषाताई चौधरी उपस्थित होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून पारवा पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस कर्मचारी रंजना मसराम, आरोग्य विभागाच्या एस. टी. घोडाम आणि निमा इंदूरकर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी सरपंच संगीताताई मडावी यांनी महिलांना शुभेच्छा देताना सांगितले की, महिला दिन हा खऱ्या अर्थाने स्त्रीशक्तीचा गौरव करणारा दिवस असून तो महिलांना आत्मविश्वासाने जगण्याची प्रेरणा देतो. महिला पोलीस कर्मचारी रंजना मसराम यांनी महिलांचे अधिकार, त्यांची सुरक्षा आणि पोलीस प्रशासनाची मदत याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच आरोग्य आणि वनविभागाच्या वतीने महिलांचे आरोग्य व पर्यावरण रक्षणाबाबत माहिती देण्यात आली.



या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थिनींनी साकारलेली विविध रूपे. मनस्वी बिरकुरवार हिने सैनिक, अर्णवी आरेवार हिने डॉक्टर, अर्पिता कुत्तरमारे हिने अभियंता, सना सय्यद हिने वैमानिक तर आलिया शेख हिने शिक्षिकेची वेशभूषा केली होती. यासोबतच अनुश्री बल्लूरवार हिने माता रमाबाई, मानसी इसपाडे हिने सावित्रीबाई फुले, अमृता बोगावार हिने वैज्ञानिक आणि निकिता तोडसाम हिने महिला शेतकऱ्याची भूमिका उत्तमरीत्या पार पाडली. या सादरीकरणाने उपस्थित नागरिक मंत्रमुग्ध झाले.

या कार्यक्रमाला गावातील महिला आणि माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. शाळा व्यवस्थापन समिती आणि शालेय पोषण आहार मदतनीस यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक शिक्षक प्रशांत भेदूरकर यांनी केले, तर मुख्याध्यापिका कु. गीता मानकर यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## भारतीय क्रिकेट संघाच्या ऐतिहासिक विजयाचा पनवेलमध्ये जल्लोष

### ॲम्बुलन्स चालक-मालक जनहित संस्थेची भव्य विजयी रॅली

**दैनिक युवक आधार**

**मुकुंद कांबळे सहसंपादक/पनवेल :** India national cricket team ने ICC Men's T20 World Cup स्पर्धेत तिसऱ्यांदा ऐतिहासिक विजय मिळवत संपूर्ण देशाचा अभिमान उंचावला आहे. आतापर्यंत कोणत्याही देशाने तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकण्याची किमया साधलेली नव्हती. भारताने ही अभूतपूर्व कामगिरी करत क्रिकेट विश्वात आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. या ऐतिहासिक विजयामुळे संपूर्ण देशभरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून प्रत्येक भारतीयाला आपल्या क्रिकेट संघाचा अभिमान वाटत आहे.

या अभिमानाच्या भावनेतून Panvel शहरातील ॲम्बुलन्स चालक-मालक जनहित संस्थेच्या वतीने भव्य विजयी रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीद्वारे संस्थेच्या सदस्यांनी भारतीय क्रिकेट संघाला मानाचा मुजरा देत त्यांच्या विजयाला सलामी दिली. रॅलीदरम्यान ॲम्बुलन्स वाहनांना तिरंगा ध्वज लावून शहरातून फेरी काढण्यात आली. *"भारत माता की जय", "जय हिंद, जय भारत",* "भारतीय क्रिकेट संघाचा विजय असो" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आणि नागरिकांमध्येही देशभक्तीची भावना जागृत झाली.रॅलीमध्ये संस्थेचे अध्यक्ष मुकुंद कांबळे, सचिव विजय जाधव, उपाध्यक्ष प्रकाश जाधव, पनवेलचे सचिव राज निम्बर्गी, सहखजिनदार कैलास नेमाडे, पनवेलचे खजिनदार भरत पाटील यांच्यासह संतोष निम्बर्गी, अनिकेत नेमाडे, संजय जाधव, गणेश खंदारे, हरीश कांबळे, ज्ञानेश्वर जाधव, तनवी विजय जाधव, पूर्वी विजय जाधव आणि इतर अनेक सदस्य मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. या सर्व सदस्यांच्या उपस्थितीमुळे रॅलीची शोभा अधिकच वाढली.






या वेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, भारतीय क्रिकेट संघाने देशासाठी मिळवलेला हा विजय प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे. खेळाडूंनी दाखवलेली मेहनत, जिद्द आणि देशासाठी खेळण्याची भावना ही प्रेरणादायी असून तरुण पिढीला त्यातून मोठा संदेश मिळतो. त्यामुळेच पनवेलमधील ॲम्बुलन्स चालक-मालकांनी आपल्या पद्धतीने हा आनंद साजरा करत भारतीय संघाला सलामी देण्याचा निर्णय घेतला.या विजयी रॅलीमुळे पनवेल शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनीही रॅलीचे स्वागत करत भारतीय क्रिकेट संघाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल आनंद व्यक्त केला. देशाच्या गौरवासाठी खेळणाऱ्या खेळाडूंना सलाम करत सर्वांनी एकमुखाने *जय हिंद, जय भारतच्या*घोषणा दिल्या.

## मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कला मंच व कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात कला मंच व कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय ) केंद्र उभारण्यात आले असून या केंद्राचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते झाले. तसेच वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदरचे महाविद्यालय अत्यंत दुर्गम भागात असले तरी येथील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भरीव मदत केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीला चालना मिळत असून आधुनिकीकरणाच्या युगात यशस्वी मार्गक्रमण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व प्रणालींचा उपयोगही येथे करण्यात येणार आहे. यावेळी बोलताना चेअरमन दळवी यांनी सांगितले की, आजचे युग तंत्रज्ञानाचे युग असून एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता ही भविष्यातील प्रगतीची महत्त्वाची दिशा ठरत आहे. शिक्षण क्षेत्रात एआयचा वापर वाढत असून त्यामुळे विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या आणि संशोधनाच्या अनेक नव्या संधी उपलब्ध होत आहेत. येथील महाविद्यालयात एआय केंद्राची स्थापना ही अत्यंत स्तुत्य बाब असून यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होईल आणि त्यांच्या कौशल्य विकासाला चालना मिळेल. विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करून नव्या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहनही चंद्रकांत दळवी यांनी केले. तसेच या महाविद्यालयाचा ग्रामीण भागातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून गौरव केला.

संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या मनोगतात संस्थेच्या कार्याचा गौरव केला. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम बनविण्याचे कार्य संस्थेने सातत्याने केले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी शाळेच्या विकासासाठी आणखी ३८ लाख रुपयांची देणगी जाहीर केली. यापूर्वीदेखील शाळेच्या विकासासाठी त्यांनी ६२ लाख रुपयांची देणगी दिली होती.कार्यक्रमात महाविद्यालयाच्या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला आमदार सुनील भुसारा, नगराध्यक्ष अमोल पाटील, संस्थेचे व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव एस.टी. गडदे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रकाश निकम, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यातील पहिली करमुक्त हिंदू - मुस्लिम - बौद्ध ऐक्याचे प्रतीक पीरसाई बाबा यात्रोत्सवाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी : शिरवाडे** वाकद :येथील हिंदू - मुस्लिम - बौद्ध धर्मीय ऐक्याचे प्रतीक असलेल्या पीरसाई बाबांचा यात्रोत्सव दि. ११ ते दि. १४ मार्च दरम्यान होणार आहे. सर्वधर्मीय एकोप्याचे दर्शन घडविणारी ही यात्रा परिसरात विशेष आकर्षण ठरते.हिंदू - मुस्लिम ऐक्याचे अनोखे दर्शन, तमाशा कलावंतांची कलापूर्ण मिरवणूक व हजेरी हे या यात्रेचे वैशिष्ट्य आहे. पीरसाई बाबा हे हिंदूंचे की मुस्लिमांचे दैवत असा वाद न घालता सर्व धर्मीय ग्रामस्थ एकोप्याने यात्रोत्सव साजरा करतात. पीरसाई बाबा ग्रामदैवत तसेच सर्व जाती - धर्मीयांचे श्रद्धास्थान असून मंदिराची देखभाल व पूजा - अर्चा मुस्लिम समाजाकडे आहे. सन १९६५-६६ च्या दरम्यान तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळातील अन्न व नागरी पुरवठा मंत्री तल्यारखान यांनी शिरवाडे गावास भेट देऊन येथे असलेल्या सर्वधर्मीय ऐक्याचे कौतुक केले होते.या यात्रेचे आणखी एक



वैशिष्ट्य म्हणजे संदलच्या दिवशी गावातील प्रत्येक घरी नवीन गव्हाचे पीठ, गूळ व तूप यापासून "मलिदा" तयार केला जातो आणि तो प्रसाद म्हणून पीरसाई बाबांना अर्पण केला जातो. निफाड तालुक्यात नैताळे पाठोपाठ मोठी भरणारी ही यात्रा असून पूर्वी येथे टांगा शर्यती होत असत. कालौघात त्या बंद झाल्या असल्या तरी खेळणी विक्रेते, रहाट व मिठाई विक्रेते मोठ्या प्रमाणावर यात्रेत सहभागी होतात. ही यात्रा पूर्णपणे करमुक्त असून ग्रामपंचायत दुकानदारांकडून कोणताही कर आकारत नाही. यात्रेनिमित्त बाहेरगावी असलेले नागरिक व चाकरमानी गावी येतात. पूर्वी यात्रेत पशुबळी देण्याची प्रथा होती. मात्र ग्रामस्थ व मुंबई येथील बौद्धाचार्य काशिनाथ धनराव यांच्या पुढाकाराने तसेच दलित ग्रामस्थांच्या सामंजस्याने ही प्रथा बंद करण्यात आली आहे. नागरिकांचा व विक्रेत्यांचा वाढता प्रतिसाद पाहता पूर्वी तीन दिवस चालणारी यात्रा आता चार दिवस भरविण्यात येत आहे.

यात्रोत्सवानिमित्त शुक्रवार दि. ६ मार्च रोजी दुपारी ४ वाजता नवरदेव हळद लावणे व घटी बसणे कार्यक्रम झाला असून रात्री ९ ते १२ वाजेपर्यंत पोपटराव कदम सह वाघे मंडळ, निळखेडे यांचे जागरण, शनिवार दि. ७ मार्च रोजी रात्री मच्छिंद्र भाऊ जगताप सह वाघे मंडळ, उजनी यांचे जागरण, रविवार दि. ८ मार्च रोजी खंडू भगत सह वाघे मंडळ, मुखेड तर सोमवार दि. ९ मार्च रोजी भाऊसाहेब कांगणे सह वाघे मंडळ, देवगाव फाटा यांचे जागरण, मंगळवार दि. १० मार्च रोजी किसन चव्हाण सह वाघे मंडळ, मुखेड यांचे जागरण आयोजित करण्यात आले आहे.बुधवार दि. ११ मार्च रोजी सायंकाळी ७ ते ९ वाजेदरम्यान संदल मिरवणूक काढण्यात येणार असून यात भागवत ब्रास बँड, मुखेड हे मुख्य आकर्षण असेल. त्यानंतर रात्री ९ वाजता पीरसाई बाबांची महापूजा होईल. गुरुवार दि. १२ मार्च रोजी दुपारी २ वाजता काठी मिरवणूक, सायंकाळी ५.३० वाजता बारा गाड्या ओढणे हा कार्यक्रम होणार असून नवरदेव म्हणून विकास फुलचंद पवार सहभागी होणार आहेत. याच दिवशी रात्री १० ते पहाटे ५ वाजेपर्यंत पोपट कदम सह वाघे मंडळ, निळखेडे यांचे लंगरी जागरण होईल. शुक्रवार दि. १३ मार्च रोजी रात्री ९ ते १२ वाजेदरम्यान सविता राणी पुणेकर सह लोकनाट्य तमाशा मंडळ यांचा लोकनाट्य तमाशा रंगणार आहे. शनिवार दि. १४ मार्च रोजी सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत तमाशा कलावंतांची हजेरी होऊन यात्रोत्सवाची सांगता होणार आहे.तरी या यात्रोत्सवास परिसरातील भाविक, दुकानदार तसेच तमाशा रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळ व यात्रोत्सव समिती यांनी केले आहे.

## टॉवर बॅटरी चोरीचा पर्दाफाश; एलसीबीच्या धडाकेबाज कारवाईत तिघे जेरबंद

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे :'** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या टॉवर बॅटरी चोरीच्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने (एलसीबी) यशस्वी उलगडा करत तीन आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी या कारवाईदरम्यान चोरीसाठी वापरण्यात आलेला सुमारे ७ लाख रुपये किंमतीचा टाटा कंपनीचा टेम्पोही जप्त केला आहे.

खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५८/२०२६ व ८२/२०२६ असे दोन गुन्हे भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या कलम ३०३(२) अंतर्गत दाखल करण्यात आले होते. या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना पोलिसांनी घटनास्थळ तसेच परिसरातील



सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी केली. फुटेजमध्ये संशयास्पद वाहनाची हालचाल दिसून आल्याने त्या वाहनाचा माग काढण्यात आला. पुढील तपासात गोपनीय बातमीदारांच्या मदतीने संशयितांचा शोध घेऊन तीन जणांना ताब्यात घेण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अविनाश मनोहर चव्हाण (वय २६, रा. गायकवाड पाडा, उल्हासनगर, ठाणे), रोहित मनोहर चव्हाण (वय २५, रा. गायकवाड पाडा, उल्हासनगर, ठाणे) आणि विजय सुरेश चव्हाण (वय २६, रा. साबाई नगर , ता. खालापूर) अशी आहेत. या तिघांकडून खालापूर पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ५८/२०२६ व ८२/२०२६ हे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

तपासादरम्यान चोरीसाठी वापरण्यात आलेला सुमारे ७ लाख रुपये किंमतीचा टाटा कंपनीचा टेम्पो पोलिसांनी जप्त केला आहे.

ही कारवाई रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल व अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील, पोलीस उपनिरीक्षक प्रसाद पाटील, सहा फौजदार संदीप पाटील, पोलीस हवालदार रणजित खराडे, शरद फरांदे, प्रतीक सावंत, रवी मुंडे तसेच पोलीस शिपाई प्रदीप खरात यांचा समावेश होता.

दरम्यान, परिसरात अशा प्रकारची संशयास्पद हालचाल आढळल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## कुमार कक्कय्या यांचे समग्र साहित्य मराठीत येणे काळाची गरज : सुशीलकुमार शिंदे

**दैनिक युवक आधार**

**सोलापूर(प्रतिनिधी) :** भीमराव पोळ ऊर्फ कुमार कक्कय्या यांनी १२व्या शतकातील श्रेष्ठ शरण वचन रक्षक डोहर कक्कय्या यांचे नाव धारण करून कन्नड साहित्यात क्रांतिकारी पुस्तकांचे लेखन केले. त्यांच्या सनातन धर्मदर्शन या पुस्तकाचा सोलापूरचे लेखक चन्नवीर भद्रेश्वरमठ यांनी अनुवाद करून कन्नड मराठी साहित्याचा पूल बांधला आहे. ढोर समाजात कुमार कक्कय्या यांचासारखा थोर लेखक झाला, ही गोष्ट भूषणावाह असून त्यांचे समग्र साहित्य मराठीत आणले पाहिजे, असे प्रतिपादन माजीकेंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.शनिवारी, निर्मलकुमार फडकुले सभागृहातसोनकवडे गुरूजी प्रतिष्ठान आणि कुमार कक्कयाप्रतिष्ठानच्यावतीने आयोजित केलेल्या सनातनधर्मदर्शन ग्रंथाच्या मराठी अनुवादीत पुस्तक प्रकाशनसोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून शिंदे बोलत होते. यावेळी ८९ व्या अखिल भारतीय मराठी



साहित्यसंमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाद सबनीस, कर्नाटकविधिमंडळाचे सदस्य नागठाणचे आमदार विठ्ठलकटकधोंड, पुस्तकाचे अनुवादक चन्नवीर भद्रेश्वरमठ,उद्योजक दत्ता सुरवसे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतननरोटे, वसंतराव मस्के, कक्कय्या प्रतिष्ठानचे अध्यक्षचिदानंद पोळ, सोनकवडे गुरुजी प्रतिष्ठानचे अध्यक्षलक्ष्मीदास सोनकवडे, सचिव राजश्री सोनकवडे,उपाध्यक्षा गीता शिंदे, प्रगती प्रकाशनचे संचालक दत्ताथोरे, गौतम पोळ उपस्थित होते. सोनकवडे गुरूजीप्रतिष्ठानच्यावतीने राबविण्यात आलेल्या स्किलडेव्हलपमेंट- कौशल्य विकास कार्यक्रमांतगृत फॅशनआणि ब्युटीशिएन कोर्स पूर्ण केलेल्या प्रातिनिधीक दोनप्रशिक्षणार्थीना सर्टिफिकेट / प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. प्रारंभी दत्ता थोरे यांनी प्रस्ताविक केले. यावेळी कुमार कक्कया पोळ प्रतिष्ठानचे अध्यक्ष चिदानंद पोळ,गौतम पोळ यानी सोनकवडे गुरुजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष लक्ष्मीदास सोनकवडे यांनी भाषणे केली. कार्यक्रमाचे वसुंधरा शर्मा यांनी केले तर आभार गीता शिंदे यानी मानले.

## सरपंच यशवंत पाटील मित्रपरिवाराच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर भवानीनगर भाग्यनगर येथे रमजान महिन्याच्या औचित्याने सरपंच यशवंतभाऊ पाटील मित्र परिवाराच्या वतीने रविवारी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाला परिसरातील मुस्लिम बांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकात्मतेचे दर्शन घडवले.

कार्यक्रमात पंचायत समितीचे सदस्य श्रीराज भरणे शब्बीरभाई काझी,रणजित निंबाळकर आणि विजय पवार यांनी रमजानच्या पवित्र महिन्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी उपवास,संयम आणि सदभावनेचा




संदेश देत समाजातील ऐक्य टिकवण्याचे आवाहन केले. रमजान हा केवळ धार्मिक उपक्रम नसून सामाजिक सलोखा आणि बंधुतेचा उत्सव असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

इफ्तार पार्टीला सरपंच यशवंतभाऊ पाटील,पंचायत समिती सदस्या ज्योस्त्ना सुरडकर,हमीदभाई तांबोळी,अरिफभाई तांबोळी इकबालभाई काझी,बाबूभाई खान,प्रतीक ढाकणे,युवा उदयोजक सागर भिसे पै.अजित सोनवणे,राजाभाऊ जाधव,मोहन सुरडकर,आसिफभाई पानसरे, शरीफभाई तांबोळी,गंजेद्र मोरे तसेच ग्रामसेवक सचिन पवार,प्रवीण शिंदे उपस्थित होते. सामूहिक प्रार्थनेतून समाजातील बंधुता,सलोखा आणि सद्भावना वृद्धिंगत करण्याचा संदेश देण्यात आला.या उपक्रमामुळे गावातील विविध समाजघटकांमध्ये परस्पर मैत्रीभाव दृढ झाला.सरपंच यशवंतभाऊ पाटील मित्र परिवाराने मुस्लिम बांधवांना रमजानच्या शुभेच्छा देत एकत्रितपणे सण साजरा करण्याचा आदर्श घालून देण्यात आला.

## नव्याने काम चालू असलेल्या पेट्रोलपंपमधून १ लाख किमतीच्या कॉपर वायरची चोरी करणाऱ्या त्रिकुटाला पनवेल तालुका पोलिसांनी घेतले ताब्यात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** नव्याने काम चालू असलेल्या पेट्रोलपंप मध्ये असलेल्या १ लाख रुपये किमतीच्या कॉपर वायरची चोरी करणाऱ्या त्रिकुटाला पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून काही प्रमाणात चोरीला गेलेला मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली गाडी हस्तगत करण्यात आली आहे.

पनवेल तालुक्यातील सोमाटणे गावाच्या हद्दीत नव्याने काम चालू असलेल्या पेट्रोलपंप मध्ये बसवण्यात



आलेल्या ट्रान्सफॉर्मर मधून अज्ञात चोरट्यांनी सुमरे १ लाख रुपये किमतीच्या कॉपर वायरची चोरी केल्याची घटना घडली होती. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गिजे, पोलीस उपनिरीक्षक राजपूत, पोहवा धुमाळ, देवरे, कुदळे, बाबर, तांडेल, महारसे, भगत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने आरोपी अनिल यादव (वय २५), अवधेश मोर्या (वय १९) आणि विष्णु चौरासिया (वय ४४) तिघेही राहणार नेरेपाडा यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले.

पोलिसांनी त्यांच्याकडून काही प्रमाणात चोरीला गेलेला मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली गाडी हस्तगत केली आहे.

## मिस नवी मुंबई 2026 चा भव्य अंतिम सोहळा अविस्मरणीय

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** ग्लॅमर, आत्मविश्वास आणि महिला सशक्तीकरणाचा १५ वर्षांचा गौरवशाली प्रवास साजरा करत 'मिस नवी मुंबई २०२६' या स्पर्धेचा भव्य ग्रँड फिनाले नुकताच सिडको एक्झिबिशन सेंटर, नवी मुंबई येथे उत्साहात पार पडला. या विशेष पर्वात परिसरातील अनेक प्रतिभावान तरुणींनी सहभाग घेतला आणि संपूर्ण कार्यक्रमात सौंदर्य, आत्मविश्वास आणि प्रतिभेचा सुरेख संगम पाहायला मिळाला.

यू अँड आय एंटरटेनमेंट यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेचे नेतृत्व व्यवस्थापकीय संचालक हरमीत सिंग गुप्ता आणि संचालक मनमीत सिंग गुप्ता यांनी केले. स्पर्धकांना व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास आणि मंचावरील सादरीकरणासाठी मानसशास्त्रज्ञ व सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षक इंदरप्रीत कौर (शेली) तसेच रॅम्प वॉक मार्गदर्शक सिमृती बथिजा यांनी विशेष प्रशिक्षण दिले.

व्यक्तिमत्त्व, प्रतिभा, संवादकौशल्य आणि आत्मविश्वास या विविध फेऱ्यांनंतर अंतिम विजेत्यांची घोषणा करण्यात आली. मिस नवी मुंबई २०२६, विजेती : परनिका टेकचंदानी, प्रथम उपविजेती प्रीती यादव तसेच द्वितीय उपविजेती राजश्री सिंह ठरली. स्पर्धकांच्या वेगळ्या व्यक्तिमत्त्व आणि कौशल्यांचा गौरव करण्यासाठी विविध विशेष पुरस्कारही देण्यात आले. सर्वोत्कृष्ट स्मितहास्य : प्रीती




यादव, सर्वोत्कृष्ट छायाचित्र व्यक्तिमत्त्व : अर्शप्रीत कौर सुरा, सर्वोत्कृष्ट रॅम्प वॉक : राशी अस्थाना, मिस कॉन्जेनिॲलिटी : राशी अस्थाना, सर्वोत्कृष्ट व्यक्तिमत्त्व : प्राजक्ता सारंगी, मिस फ्रेश फेस : दिशा बाग्रेचा, सर्वोत्कृष्ट त्वचा : जिसा साजी, सर्वोत्कृष्ट डोळे : अर्शप्रीत कौर सुरा, मिस टॅलेंट : सानिया सोनल, मिस इंटरनेट पॉप्युलर : राजश्री सिंह, मिस स्टाइल आयकॉन : राणी शिंदे, सर्वोत्कृष्ट केस : एकता विश्वकर्मा, गर्ल ऑफ द शो : राणी शिंदे या सौन्दर्यवतींना घोषित करण्यात आले.

या स्पर्धेचे निकाल प्रतिष्ठित परीक्षकांमध्ये संजिव कुमार (संचालक, एस.के. ग्रुप), अशोक मेहरा (मालक, शिकारा ग्रुप), अभिजीत आदुरकर (महाव्यवस्थापक, द रिसॉर्ट हॉटेल), रोणक विज (संचालक, रोणक ॲडव्हर्टायझिंग प्रा. लि.), रिया मेक्काटुकुलम (अभिनेत्री व मिस क्वीन ऑफ इंडिया २०२१), योगिता राठोड (लिवा मिस दिवा रनर-अप २०२४), तमन्ना भारत (मिस नवी मुंबई २०२४ व मिस एशिया ग्लोबल २०२४) आणि डॉ. शिशिर शेट्टी (संचालक, ऑन्कोलॉजी विभाग, फोर्टिस हॉस्पिटल) यांचा समावेश होता. कार्यक्रमात लोकप्रिय सन्यास बँडच्या लाइव्ह परफॉर्मन्सने प्रेक्षकांची विशेष दाद मिळवली. मनमीत सिंग यांच्या नेतृत्वाखालील या सादरीकरणाने संपूर्ण वातावरण उत्साहपूर्ण केले.

गेल्या १५ वर्षांत 'मिस नवी मुंबई' ही स्पर्धा केवळ सौंदर्यस्पर्धा न राहता तरुणींना आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास आणि समाजात स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरली आहे. या मैलाचा दगड ठरलेल्या पर्वाने पुन्हा एकदा आधुनिक स्त्रीशक्तीचा गौरव साजरा केला.

# ज्ञानदा महिला महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रोशन खोब्रागडे/लाखनी भंडारा** : तिरोडा तालुक्यातील वडेगाव येथील ज्ञानदा महिला महाविद्यालयात जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य छोटू देवपुरी पुरी यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य छोटू देवपुरी पुरी म्हणाले की, महिलांनी शिक्षण, विज्ञान, कला, प्रशासन तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून समाजाला नवी दिशा दिली आहे. महिला सशक्तीकरणासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असून विद्यार्थिनींनी आत्मविश्वासाने पुढे जात समाजाच्या



प्रगतीत आपला मोलाचा वाटा उचलावा, असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या म्हणून प्राध्यापिका छाया राऊत यांनी महिलांच्या हक्क, समानता व स्वावलंबन याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थिनींना शिक्षणासोबतच सामाजिक जाणीव ठेवून पुढे जाण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय रंगारी यांनी केले तर आभार डॉ. अविनाश कांबळे यांनी मानले.

# अबोली महिला रिक्षा चालक संघटनेच्या माध्यमातून महिलांसाठी मोलाचे कार्य

## संघटनेचा वर्धापन दिन व महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी** : महाराष्ट्रातील पहिली महिला रिक्षा चालकांची संघटना म्हणून ओळख मिळवलेल्या अबोली महिला रिक्षा चालक संघटनेतर्फे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांच्या कार्याचा महिलांकडून विशेष गौरव करण्यात आला.

सुमारे आठ वर्षांपूर्वी महिला दिनाचे औचित्य साधून संतोष भगत यांनी अबोली महिला रिक्षा चालक संघटनेची स्थापना केली. महिलांना स्वावलंबी बनविणे, त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे आणि समाजात सन्मानाने उभे राहण्यासाठी व्यासपीठ निर्माण करणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश होता. संतोष भगत यांनी अथक परिश्रम घेऊन ही संघटना वाढविली असून आज नवी मुंबई, ठाणे आणि पनवेल परिसरात संघटनेचे जाळे विस्तारले आहे.



दरवर्षी संघटनेचा वर्धापन दिन आणि जागतिक महिला दिन असा दुग्धशर्करा योग साजरा केला जातो. यावर्षीही कोपरखैरणे येथे संघटनेच्या महिला सदस्यांना संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांच्या वतीने साडीवाटप करण्यात आले. त्यानंतर पनवेल येथेही संघटनेतील महिला रिक्षा चालकांना साडी वाटप करून महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमाला उपाध्यक्ष सुलोचना भगत, कोपरखैरणे उपाध्यक्ष दिशा वाघमारे, तसेच पनवेल येथील कार्यक्रमासाठी खजिनदार ललिता राऊत, पदाधिकारी व मोठ्या संख्येने महिला सदस्या उपस्थित होत्या.

यावेळी उपस्थित महिलांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अबोली महिला रिक्षा चालक संघटनेमुळे आम्हाला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद मिळाली. आज आम्ही रिक्षा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आहोत. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी संतोष भगत सातत्याने प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या या उपक्रमामुळे अनेक महिलांना रोजगाराची नवी दिशा मिळाली असून, समाजात महिलांच्या सक्षमीकरणाचे एक प्रभावी उदाहरण म्हणून अबोली महिला रिक्षा चालक संघटना



पुढे येत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

संतोष भगत यांनी आम्हाला कोरोना काळात खूप मदत केली. तसेच कुठेही काही समस्या आली ते तातडीने हजर राहतात. संतोष भगत यांच्यामुळे रिक्षा व्यवसाय करणे आम्हाला सोपे झाले आहे. त्यामुळे संस्थापक अध्यक्ष संतोष भगत यांचे आम्ही कोपरखैरणे येथील संघटनेतर्फे आभार मानण्यात आले.

पनवेल येथील कार्यक्रमात खजिनदार ललिता राऊत यांनी सांगितले की, संतोष भगत यांच्यासारखे संस्थापक अध्यक्ष आम्हाला लाभले याचा खरंच आम्हाला अभिमान आहे. कोरोना काळात त्यांनी केलेली अन्नधान्याची मदत ही प्रत्येक कुटूंबासाठी महत्वाची होती. ज्या महिला येवू शकल्या नाहीत त्या महिलांच्या घरपोच अन्नधान्य पोहचविण्यात आले. आज आठ वर्षे ते सतत ही संघटनावाढीसाठी प्रयत्न करत आहेत.

आज पनवेल मधील सर्व अबोली महिला रिक्षा चालक सदस्यांकडून त्यांचे आभार मानते.

# उरण करंजा आगरीपाडाचा सार्थ अभिमान ! "दिपराज थळी" याची शानदार कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/ प्रदीप पाटील** : दिनांक 6 मार्च 2026 रोजी डोंबिवली येथे झालेल्या Mr. भारतीय सम्राट 2026 मॉडेलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्ध्येमध्ये मुली,मुले व लहानमुले,असे सर्व मिळून एकूण 50 स्पर्धकानी आपला सहभाग नोंदविला होता. या स्पर्ध्येमध्ये उरण करंजा आगरीपाडा गावातील "दिपराज चंद्रकांत थळी" यांनी शानदार कामगिरी



करत 1St Runner-Up हा किताब पटकावला, करंजा गावाचे नाव उज्ज्वल करण्याबरोबरच दिपराज थळी यांनी संपूर्ण उरण तालुक्याचे नाव ही उज्वल केले आहे.त्यांच्या या दमदार यशामुळे संपूर्ण तालुक्या मधून त्याचे कौतुक करण्यात येत असून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षावहोत असून अनेकांनीत्याला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा! दिल्या आहेत

# म्हसळा येथील नाईक -अंतुले महाविद्यालयात पोस्ट बजेट विषयावर वेबिनारचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा प्रतिनिधी शिरीष समेळ** : भारत सरकारच्या केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी केलेल्या सबका साथ सबका विकास या महत्त्वाच्या घोषणांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आणि विविध मंत्रालयांमधील समन्वय व सामायिक जबाबदाऱ्या यावर चर्चा करण्यासाठी तसेच उच्च शिक्षण क्षेत्राशी संबंधित महत्त्वाच्या मुद्यांवर विचारविनिमय करण्याच्या उद्देशाने दिनांक ०९ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात ऑनलाईन




स्वरूपात वेबीनारचे आयोजन करण्यात आले यामध्ये महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते

वेबिनारच्या सुरूवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य दिगंबर टेकळे यांनी वेबिनार आयोजनाचा उद्देश विद्यार्थ्यांना समजावून सांगितला त्यानंतर राष्ट्रीय येवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा मयुर बढे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी युट्यूबच्या माध्यमातून प्रोजेक्टरच्या साह्याने वेबिनारचे सादरीकरणास सुरूवात केली या वेबीनार मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत सबका साथ सबका विकास आणि लोकांच्या अपेक्षाची पुर्तता करण्यात सरकारची भुमिका आणि त्याची कार्यवाही याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वांना संबोधित केले ऑनलाईन वेबीनारचे उद्घाटन सत्र, ब्रेकआउट सत्रे आणि समारोप सत्र अशा तीन वेगवेगळ्या सत्रात आयोजन करण्यात आले होते.

# रायझिंग इंग्लिश स्कूलचे 10 वे वार्षिक स्नेहसंमेलन आज

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी** : गेवराई तालुक्यातील सुशी येथील केसूला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित रायसिना इंग्लिश स्कूल चे 10 वे वार्षिक स्नेहसंमेलन दि. 10 मार्च 2026 वार-मंगळवार रोजी सायंकाळी 6.00 वाजता आयोजित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमाचे उद्धाटक श्री.किशोर पवार (पोलीस निरीक्षक, गेवराई)श्री.संतोष जंजाळ(स.पोलीस निरीक्षक,गेवराई)मा.श्री.राजाभाऊ गर्जे साहेब (पोलीस उपनिरीक्षक पो.स्टे.गेवराई)कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गटशिक्षणाधिकारी प्रविण काळम पाटील यांची प्रमुख उपस्थित राहणार आहेतकार्यक्रमास सामाजिक ,शैक्षणिक ,राजकीय ,क्षेत्रातील मान्यवर तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्कूलचे प्राचार्य श्री राठोड सर यांनी केले आहे.




# उलवे येथे जागतिक महिला दिन साजरा, एड . प्रोफेसर प्रियांका डोके-मंडलिक यांनी केले संबोधित

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : जागतिक महिला दिनानिमित्त आठ मार्च रोजी उलवे, पनवेल या ठिकाणी महिला दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांच्या सन्मानार्थ सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, गाणे, फॅशन शो आयोजित करण्यात आले होते. यावेळी एड. प्रोफेसर प्रियांका डोके-मंडलिक (एचओडी ऑफ एलएलएम डिपार्टमेंट, डॉ.डी वाय पाटील कॉलेज ऑफ लॉ, नेरूळ) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी 1911 मध्ये पहिल्यांदा आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा झाल्याचे प्रियंका डोके-मंडलिक यांनी सांगितले. आणि तेव्हापासून लाखो, करोडो महिलांनी शिक्षणासाठी, मतदानासाठी, कामाच्या हक्कासाठी लढा दिला आणि आजही तो लढा संपला नसून तो अधिक तीव्र व आवश्यक झाल्याचे सांगितले. आजही अनेक मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. हिंसाचार, बालविवाह, लैंगिक छळ होत आहेत मात्र तरी देखील अनेक भारतीय महिलांनी अनेक क्षेत्रात कमाल केली आहे. हे यश एकट्या महिलेचे नाही तर ते यश ज्या आई-वडिलांनी शिक्षण दिले, शिक्षकांनी प्रोत्साहन दिले,



समाजाने संधी दिली, सरकारने कायदे केले म्हणूनच यश मिळाले. तसेच स्त्री पुरुष स्पर्धा नसून ती भागीदारी आहे. महिलांसाठी आवश्यक असणाऱ्या कायद्यान्वये घरगुती हिंसापासून संरक्षण होते, शारीरिक, मानसिक छळाविरुद्ध कायदेशीर मदत मिळते. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळापासून संरक्षण करते. यावेळी सायबर क्राईम याबद्दल प्रियांका डोके-मंडलिक यांनी माहिती देत कोणाची फसवणूक झाल्यास पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यास सांगितली. यावेळी पोलीस निरीक्षक सुषमा पाटील यांनी महिला दिनानिमित्त महिलांना संबोधित केले आणि महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे आवाहन केले.

# धर्माबाद येथील राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिरचा विद्यार्थी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये चमकला

## SOF ISSO ऑलिम्पियाडमध्ये मध्ये सहर्ष सुर्यकार ने मिळवला शाळेत प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी/गिरमाजी सुर्यकार** : धर्माबाद येथील राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर या शाळेतील विद्यार्थी सहर्ष गिरमाजी सूर्यकार* याने आंतरराष्ट्रीय स्तरावरील International Social Studies Olympiad (ISSO) 2025-26 या प्रतिष्ठित स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत शाळेचा नावलौकिक वाढवला आहे. ही परीक्षा Science Olympiad Foundation (SOF) या आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त संस्थेमार्फत आयोजित करण्यात आली होती.

इयत्ता चौथी (तुकडी – M) मध्ये शिक्षण घेणाऱ्या सहर्षने 40 पैकी 17 गुण मिळवत 42.50 टक्के गुण प्राप्त केले. त्याचा पर्सेंटाइल स्कोर 28.19 इतका असून त्याने आपल्या शाळेत प्रथम क्रमांक (School Rank – 1) पटकावला आहे. याशिवाय विभागीय स्तरावर 103 वा, झोनल स्तरावर 90 वा आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर 109 वा क्रमांक मिळवत त्याने स्पर्धात्मक वातावरणात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

लहान वयातच *सहर्षने* दाखवलेली अभ्यासातील चिकाटी, परिश्रम आणि स्पर्धात्मक वृत्ती ही त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी सकारात्मक संकेत मानले जात आहेत. या यशाबद्दल सहर्षला Participation Certificate तसेच Student Progress Report (SPR) प्रदान करण्यात येणार आहे.

सहर्षच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व पालकांनी त्याचे विशेष अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असून अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना आपली बौद्धिक क्षमता दाखवण्याची संधी मिळते, असे मत शाळा प्रशासनाने व्यक्त केले.



**कामगिरीचा आढावा :**

परीक्षा : SOF ISSO – International Social Studies Olympiad 2025-26

विद्यार्थी : सहर्ष गिरमाजी सूर्यकार

शाळा : राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर, नांदेड

गुण : 17/40 (42.50%)

पर्सेंटाइल : 28.19

शाळा क्रमांक : 1

प्रादेशिक क्रमांक : 103

विभागीय क्रमांक : 90

आंतरराष्ट्रीय क्रमांक : 109

सहर्ष सूर्यकार च्या या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी यशामुळे राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर या शाळेचा शैक्षणिक गौरव वाढला असून, इतर विद्यार्थ्यांनाही स्पर्धात्मक परीक्षांमध्ये सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली आहे.

सहर्षच्या या कामगिरीमुळे कुटुंबीयांसह शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# न्हावा ग्रामसुधारणा मंडळाच्या अध्यक्षपदी राजेश घरत बिनविरोध ; महेंद्रशेठ घरत यांनी सुखकर्तावर केले अभिनंदन

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर** : न्हावा ग्रामसुधारणा मंडळाच्या अध्यक्षपदी राजेश घरत यांची नुकतीच सर्वपक्षीय बिनविरोध निवड झाली. उपाध्यक्ष म्हणून नितीन भोईर, सुशांत बांद्रे, सतीश भोईर, जयेंद्र पाटील, तर खजीनदार निलेश भोईर, सहखजीनदार चेतन कडू, उमेश भोईर, अनंत म्हात्रे, समाधान म्हात्रे यांचीही बिनविरोध निवड झाली.



यावेळी न्हावा येथील सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच शैलेश पाटील आणि ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांनी विद्यमान पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आणि न्हावा गावात विकासात्मक कामांसाठी सर्वांनी एकत्र येऊन गुण्यागोविंदाने राहण्याचे आवाहन करण्यात आले.

न्हावा ग्रामसुधारणा मंडळाच्या अध्यक्षपदी राजेश घरत यांची बिनविरोध निवड होताच त्यांनी शनिवारी (ता. ७) आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांची शेलघर येथील 'सुखकर्ता' बंगल्यावर भेट घेतली.

त्यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी राजेश घरत यांचे पुष्पगुच्छ आणि शाल देऊन अभिनंदन केले. यावेळी न्हावा येथील ग्रामस्थ राजाराम ठाकूर, माजी उपसरपंच काशिनाथ ठाकूर, काँग्रेसचे उपतालुका प्रमुख किसन पाटील, युवा अध्यक्ष अक्षय ठाकूर, निलेश भोईर आदी उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# प्रा .शिवाली निंबाळकर यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** नवक्रांती सेवाभावी संस्था महाराष्ट्र राज्य, विद्या प्रतिष्ठानचे कमल नयन बजाज अभियांत्रिकी महाविद्यालय, बारामती व मानव सुरक्षा सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळयात श्रीमती शिवाली मालोजीराजे निंबाळकर यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्याचा उपक्रम नवक्रांती सेवाभावी संस्था सातत्याने राबवत असून, यंदा शिक्षक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याचा आढावा घेऊन निवड समितीने श्रीमती शिवाली मालोजीराजे निंबाळकर यांची निवड केली.त्यांच्या अध्यापनातील नवनवीन उपक्रम, विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित शिक्षणाची जडणघडण आणि सामाजिक बांधिलकी यामुळे त्यांना हा मानाचा तुरा प्राप्त झाला आहे.

पुरस्कार सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले



की, "शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार असतो. शिवाली निंबाळकर यांनी आपल्या अध्यापनातून विद्यार्थ्यांना केवळ ज्ञानच नव्हे तर संस्कार दिले आहेत."

या सन्मानानंतर परिसरात आनंदाचे वातावरण असून, सहकारी शिक्षक, विद्यार्थी व समाजातील विविध घटकांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.श्रीमती शिवाली निंबाळकर यांच्या पुढील कार्यास मनःपूर्वक शुभेच्छा देत, समाजातील आदर्श शिक्षक म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ व्हावी,अशी अपेक्षा यावेळी आयोजक यांनी व्यक्त करण्यात आली.

# माणसाने जीवनात सत्संग करावा - ह. भ. प. राऊत दादा महाराज

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे** : संतांच्या विचारांचा स्वीकार केल्यास समाजात सद्भावना, प्रेम व परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागते. माणसाने जीवनात सत्संग, नामस्मरण व परोपकार या गोष्टी अंगीकारल्यास जीवन अधिक सुंदर व अर्थपूर्ण होते, असे ह .भ.प. राऊत दादा महाराज पिंपळेश्वर संस्था पिंपळा यांनी म्हटले. आनंदवाडी / सराटे वडगाव येथील मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांच्या मातोश्री स्व. अंजनाबाई कारभारी बोडखे प्रथम पुण्यस्मरणा निमित्त आयोजित प्रवचन सेवेप्रसंगी बोलत होते. याप्रसंगी ह. भ. प. निवृत्ती (दादा) बोडखे, ह. भ. प. रोहिदास महाराज बोडखे, मुख्याध्यापक बाळासाहेब दसुंगे, मुख्याध्यापक शेख अकिल , मुख्याध्यापक सुरेश बोडखे ,सेवानिवृत्त पोलीस अधिकारी शेख



अन्सार, बाळासाहेब बेरड, सुखदेव महाराज बोडखे, सेवा सोसायटी चेअरमन बबन नंनवरे, राजाराम नन्नवरे, प्रशासन अधिकारी माऊली बोडखे , पत्रकार दिगंबर बोडखे , पांडुरंग खराडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी पुढे बोलताना राऊत दादा यांनी म्हटले की, माणसाच्या जीवनात अहंकारामुळे दुःख निर्माण होते. जोपर्यंत माणूस काम, क्रोध, लोफ, मद, मत्सर या विकारांवर विजय मिळवत नाही, तोपर्यंत खऱ्या सुखाची प्राप्ती होणार नाही. स्व . मातोश्री अंजनाबाई कारभारी बोडखे यांनी आपल्या शेतीशी प्रमाणिक राहून संसार फुलाप्रमाणे फुलविला. आज कुटुंबातील वैभव यांच्या त्या कर्तृत्व व कष्टातून उभे राहिले आहे. असे राऊत दादा यांनी सांगितले. यांच्या प्रभावी प्रवचनाचा कार्यक्रम भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास ग्रामस्थ, नातेवाईक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्व. अंजनाबाई कारभारी बोडखे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर ह.भ.प. राऊत दादा महाराज यांनी आपल्या प्रवचनातून संत साहित्य, भक्तीमार्ग व आदर्श जीवनमूल्ये यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी सांगितले की, माणसाने जीवनात सदाचार, प्रेम, परोपकार व सत्संग यांचा अवलंब केल्यास जीवन अधिक अर्थपूर्ण होते. संतांच्या मिळते, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

स्व. अंजनाबाई बोडखे या अत्यंत साध्या, प्रेमळ व धार्मिक वृत्तीच्या होत्या. समाजातील सर्वांशी आत्मीयतेने वागून त्यांनी आपले जीवन मूल्यनिष्ठ पद्धतीने व्यतीत केले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या या प्रवचन कार्यक्रमामुळे उपस्थितांना अध्यात्मिक प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित भाविकांनी स्व. अंजनाबाई बोडखे यांच्या स्मृतींना अभिवादन केले. याप्रसंगी ह. भ. प. निवृत्ती दादा बोडखे ,रोहिदास महाराज बोडखे ,सुखदेव महाराज बोडखे ,मुख्याध्यापक बाळासाहेब दसूंगे, गवारे सर, शेख अन्सार यांनी यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली .उपस्थित सर्वांचे प्रा. डॉ. जी.पी. बोडखे यांनी ऋण व्यक्त केले.

# सायखेड्यात डॉक्टर दांपत्यावर थरारक हल्ला; विनयभंगाचा प्रयत्न, कारची तोडफोड — तिघांवर गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :**सायखेडा येथे क्षुल्लक कारणावरून डॉक्टर दांपत्यावर हल्ला करून मारहाण तसेच महिलेचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी सायखेडा पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत डॉ. प्रशांत वसंत कांडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केल्यानुसार, रविवारी (दि.८ मार्च) सायंकाळी ते त्यांच्या ब्रिझा कारने (एमएच १५ जेएम ८३११) सोनगाव येथून भेंडाळी रोडमार्गे सायखेड्यातील सिद्धीविनायक हॉस्पिटलकडे येत होते. यावेळी सागर कापसे, ऋतिक कापसे



व साहिल पटेल (सर्व रा. सायखेडा) यांनी मोटारसायकल (एमएच १५ जे.टी. ०८८६) डॉक्टरांच्या गाडीला पाठीमागून धडक दिली.यानंतर आरोपींनी वाद घालत शिवीगाळ केली व डॉक्टरांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यातील एका आरोपीने 'आज तुझा जीव घेतो' अशी धमकी दिली. जीव वाचवण्यासाठी डॉक्टर हॉस्पिटलकडे पळत असताना आरोपींपैकी एकाने मोठा दगड उचलून त्यांच्या पाठीवर मारल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली.दरम्यान डॉक्टरांची पत्नी मध्यस्थी करण्यासाठी आली असता आरोपींपैकी एकाने तिचा हात धरून विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आरोपींनी सिद्धीविनायक हॉस्पिटलच्या काचेच्या दरवाजावर लाथा मारून दहशत निर्माण केली तसेच डॉक्टरांच्या ब्रिझा कारच्या काचा फोडून सुमारे २० हजार रुपयांचे नुकसान केले. घटनेची माहिती मिळताच संतप्त ग्रामस्थ व गोदाकाठ मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी सोनगाव–सायखेडा रस्त्यावर रास्ता रोको करण्यात आला. त्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.माहिती मिळताच सायखेडा पोलीस ठाण्याचे निरीक्षक संदीप घुगे यांनी घटनास्थळी धाव घेतली. जमाव वाढल्याने निफाड पोलीस निरीक्षक गणेश गुरव व सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय गायकवाड यांनीही घटनास्थळी येत आंदोलकांना शांत केले. या प्रकरणी गु.र.न. ४३/२०२६ अन्वये भा.न्या.संहिता २०२३ चे कलम ११८(१), ७४, ३२४(४), ११५(२), ३५१(२), ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्लास्टिक मुक्ती साठी समीर पाटील याचा सारडे गावासाठी पुढाकार

## महिला दिनाचे औचित्य साधून बचत गटाला दिली २०० ताट व वाट्या भेट

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी.भोईर :** उरण तालुक्यातील सारडे गावात मार्च ०८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधून आर्यन ग्रुप ऑफ कंपनी चिर्लेचे डायरेक्ट समीर पाटील याच्या संकल्पनेतून सारडे गावातील श्री राधाकृष्ण महिला गटाला २०० स्टील ताट आणि २०० स्टील ग्लास देण्यात आली आहेत. या मागील उद्देश विचारात घेता लग्नसराई जवळ आली आहे व सर्रास लग्नात किंवा सार्वजनिक कार्यात प्लास्टिक पत्रावळी आणि प्लास्टिक ग्लास यांचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे, शरीराला



हानिकारण असणाऱ्या प्लास्टिक पत्रावळी पासून व ग्लास पासून कॅन्सर सारख्या भयानक रोगाला आमंत्रण दिले जात आहे. यावर एक जालीम उपाय म्हणून आर्यन ग्रुप ऑफ कंपनी चिर्लेचे डायरेक्ट समीर पाटील यांच्या डोक्यात एक कल्पना आली आणि त्यांनी महिलां दिनाचं औचित्य साधुन सारडे गावातील श्री राधाकृष्ण महिला गटाला २०० स्टील ताट आणि २०० स्टिल ग्लास देण्यात आली आहेत ,आगदी कमी भाड आकारून या गटातर्फे ही ताट आणि ग्लास गावातील हळदी, लग्न, पूजा , किंवा इतर सार्वजनिक कार्यास दिली जाणार आहेत. आर्यन ग्रुप ऑफ कंपनी चिर्ले चे डायरेक्ट समीर पाटील ह्याच सर्व स्तरावरून कौतुक केलं जात आहे की अश्या समाज हिताच्या आणि समाज परिवर्तन घडवून आण्यासाठी आज त्यांनी पुढाकार घेतला आहे. गटाच्या सदस्या सुलक्षणा पाटील,रजनी म्हात्रे, कविता गावंड, जागृती पाटील, भगवती पाटील, अर्चना पाटील, जयश्री पाटील, मंदा पाटील, पुष्पा पाटील यांनी आभार मानले, एका बाजूला प्लास्टिक मुक्तीसाठी समीर पाटील यांनी सारडे गावासाठी पहिले पाऊल उचलले आहे. व महिला दिनाचं औचित्य साधून त्यांनी महिला गटाला देखील एक कमाईच साधन निर्माण करून दिले आहे.आपल्या गटाला मिळालेल्या साहित्यामुळे महिलांनी आनंद व्यक्त केला आहे.

# भारज बुद्रुक येथील भव्य दिव्य पायी दिंडी सोहळा 10 मार्चपासून सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**वरूड सर्कल प्रतिनिधी/ज्ञानेश्वर कुं निकाळजे** : जाफराबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथील पायी दिंडी सोहळा 10 मार्चपासून सुरुवात होत आहे या पायी दिंडी सोहळयाची भाविक मोठ्या आतुरतेने वाट पाहतात विशेष म्हणजे या पायी दिंडी सोहळयाची विशेष तयारी गेल्या दोन महिन्यापासून भारज बु येथे कमिटी मार्फत व गावकऱ्या मार्फत चालू होती पायी दिंडी 10 मार्च रोजी भारज बुद्रुक येथून प्रस्थान करेल दिंडी सोबत गजानन महाराज यांचा रथ सकाळी भव्य आरती होऊन रथाचे नगर प्रदक्षिणा द्वारे सुरुवात होईल या रथासोबत जवळपास 1500 महिला पुरुष स्वयंसेवक पायी दिंडी मध्ये सहभागी असेल या पायी दिंडी सोबत आठ पाण्याचे टँकर इतर 30 वाहने सोबत असतील पायी दिंडी मधील भाविक महिला भगव्या साडीमध्ये तर पुरुष पांढरा शर्ट व पायजमा



या पोशाखात व लाईन मध्ये शिस्त मध्ये असणार आहे चिखली जवळील शेलुद येथे होईल या ठिकाणी कीर्तन प्रवचनाचा कार्यक्रम ह भ प महेश गिरी महाराज उपस्थित भाविक यांना प्रबोधन करतील दिंडीचा दुसरा मुक्काम दिनांक 11 मार्च रोजी उदयनगर येथे होईल येथे रात्रीची कीर्तन सेवा ह भ प शिवाजी महाराज तळेकर यांच्या सुमधुर वाणीतून ते भाविकांना प्रबोधन करतील दिंडीचा तिसरा मुक्काम आंतरज येथे होईल या ठिकाणी कीर्तन सेवा अनेकांचे जीवन व्यसनमुक्त करणारे असे शेलुदेतील ह भ प ज्ञानेश्वर माऊली शेलुदकर यांचे सुमोधन कीर्तन सेवा होईल त्यानंतर शेवटचा मुक्काम बाबाचा मळा येथे सुद्धा कीर्तन सेवा होईल भक्ती आणि शक्तीचा संगम असलेल्या या पायी दिंडी सोहळ्या विराट रूप रस्त्याने जाणाऱ्या भाविकांना दिसणार तर आहेच या दिंडी सेवे सोबत सर्व सोयी सुविधा युक्त आहे यामध्ये या मार्गावरील पोलीस स्टेशनचे सुद्धा सहकार्य आहे यामध्ये पोलीस स्टेशन जाफराबाद चिखली अमडापूर देवपूर खामगाव शेगाव पायी चालणाऱ्या भाविक यांसाठी थंड पाण्याची व्यवस्था मेडिकल सेवा सुद्धा सोबत असणार आहे त्याचप्रमाणे प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी वैद्यकीय सेवा यासाठी व मेडिकल सेवेसाठी गावातील सर्व डॉक्टर बांधव मेडिकल संचालक आपली उपस्थिती दर्शवणार आहे भारज बुद्रुक गाव सांस्कृतिक व धार्मिक वारसा जोपासणारे गाव असून गेल्या अनेक वर्षापासून धार्मिक कार्य अविरतपणे चालू आहे यासाठी सर्व गावकरी दिंडी सोहळा कमिटी सांघिक प्रयत्न करून हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेत आहे पायी दिंडी सोहळयासाठी मंडप व डेकोरेशन सिस्टम श्री दशरथ दिलवाले गणेश तेलंग्रे त्यांची कामगिरी वखाण्याजोगी असते पायी दिंडीचे हे सलग आठवे वर्ष असून पायी दिंडी जाणाऱ्या भाविकांसाठी सर्वजण नागरिकांनी खूप खूप शुभेच्छा दिल्या

# आंतरराष्ट्रीय जागतिक महिला दिना निमित्त इनरव्हील क्लब खोपोली तर्फे सारी वॉकेथॉन हा उपक्रम राबविण्यात आला

**दैनिक युवक आधार**

**खालापुर - संतोष शेवाळ :** इनरव्हील क्लब खोपोली तर्फे सारी वॉकेथॉन हा उपक्रम परम पूज्य गगनगिरी महाराज आश्रम येथे घेण्यात आला. या मध्ये 35 महिला उपस्थित होत्या सर्व महिलांनी वेगवेगळ्या प्रकारच्या साड्या घालून साडी वॉकथॅान केले.ह्या कार्यक्रमामधून महिला सक्षमीकरण, आरोग्य जागरूकता हा उद्देश साध्य करणे हा होता.सारी वॉकेथॉन साठी आलेल्या सर्व महिलांचा महिलादिनानिमित्त आश्रमातर्फे शाल देऊन सत्कार करण्यात आला.त्यानंतर 10 अतिशय गरजू विधवा महिलांचा ज्या धुणी भांडी आणि भाजी वगैरे विकून स्वतःचा आणि परिवाराचा उदरनिर्वाह करतात त्यांचा सत्कार माजी नगराध्यक्ष सुनील पाटील यांच्या हस्ते करण्यात आला, सर्व महिलांना साडी, रोख रुपये दहा हजार व क्लब तर्फे प्रत्येकी सव्वादोन किलो साखर देण्यात आली. ह्यातली साडी व



रोख रुपये हे आश्रमातर्फे इनरव्हील च्या माजी अध्यक्षा रुबी मॅडम यांनी स्पॉन्सर केले.

या कार्यक्रमासाठी गगनगिरी आश्रमाचे सर्वेसर्वा आशिषभाई वझीर, त्यांच्या पत्नी सौ रूबी वझीर, श्री व सौ पाटणकर, श्री मानेजी तसेच इनरव्हील क्लब अध्यक्षा दीना शहा, सेक्रेटरी मधुमिता पाटील, व्हाइस प्रेसिडेंट राजश्री मुंदडा, आयपीपी जयश्री कलोशी, ट्रेझरर दीपिका कोठारी, एडिटर एकता भदोरिया, आणि क्लब मधले बरेच सदस्य व बाहेरील विविध संस्थांतील महिला सदस्य असे एकूण 40 जण उपस्थित होते.

# साप्ताहिक आम्ही मुंबईकर व्दारा पुरस्कार सोहळा मोठ्या जल्लोषात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पुणे प्रतिनिधी :** भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम साप्ताहिक आम्ही मुंबईकर व्दारा पुरस्कार सोहळा मोठ्या जल्लोषात संपन्न झाला.रविवार दिनांक ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ११वाजलेपासून दुपारी २ वाजेपर्यंत पुणे येथील काकडे देशमुख यांच्या उत्कर्ष शाळेत महिला दिनाचे औचित्य साधून आम्ही मुंबईकर वर्तमानपत्र व्दारा महाराष्ट्र राज्यातील साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांसाठी साहित्य सांस्कृतिक पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले, सुरुवातीला सरस्वती पूजन करून दिप प्रज्वलन करण्यात आले, आम्ही मुंबईकर व्दारा अध्यक्ष, उद्घाटक, स्वागताध्यक्ष, प्रमुख पाहुणे यांचे सत्कार करण्यात आले,



या प्रसंगी उद्घाटक सौ.वसुधा नाईक यांनी सांगितले की, ' आम्ही मुंबईकर मार्फत सकारात्मक पत्रकारिता जपू या,१ पानांचा अंक १० पानावर पोहचला,'तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले ज्येष्ठ पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके यांनी सांगितले की,' महाराष्ट्र राज्यातील अनेक पत्रकार व साहित्यिक यांना आम्ही मुंबईकर व्दारा संपादक प्रमोद सूर्यवंशी यांनी संधी प्राप्त करून दिली असल्याने प्रमोद सूर्यवंशी यांचे आभार " प्रमुख पाहुणे निलेश दातार यांनी गंगाधर टिपरे यांच्या अभिनयाची नक्कल करून दाखवली, प्रिया दामले यांनी आम्ही मुंबईकर वर्तमानपत्राचे कौतुक करुन शब्द ही कविता सादर केली, अध्यक्ष शरदचंद्र काकडे देशमुख यांनी शाळा काढल्या तेव्हा आलेल्या अडचणी सांगितल्या, प्रास्ताविकात संपादक प्रमोद सूर्यवंशी यांनी सांगितले की," हा पेपर काढला तेव्हा मला जेष्ठ पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके आणि ग्राफिक डिझायनर अंगद दराडे यांनी अत्यंत मोलाचे सहकार्य केले, तसेच तुमच्या सर्वांच्या सहकार्याने मी आम्ही मुंबईकर वर्तमानपत्र चालू ठेवले आहे, किती ही संकटे आली तरी मुंबईकर मागे हटत नाही, म्हणून हे नाव ही सार्थ आहे."या वेळी योगिता कोठेकर यांच्या संस्कार शिदोरी या चारोळी संग्रहाचे प्रकाशन व्यासपीठावर उपस्थित असलेल्या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, सूत्रसंचालन गौरव पुंडे यांनी केले, या प्रसंगी श्रीराम घडे, विजय सातपुते, अशोक मोहिते, नंदा सावंत, अनुपमा जाधव, दुर्गा पवार,

सूत्र संचालन युवराज्ञी सोनवणे,गौरव पुंडे यांनी केले.योगिता कोठेकर, भारत कवितके, स्वाती ताई तोंडे पाटील,तेज न्यूज चे संपादक प्रशांत माळवदे, सुनील इंगळे,यांनी मनोगत व्यक्त करुन कविता सादर केल्या. मान्यवरांच्या हस्ते साहित्य सांस्कृतिक पुरस्कार २०२६ चे वितरण करण्यात आले, प्रज्ञा सिद्धार्थ घोरपडे श्री .अरुण बुंदेलेप्रदीप पंढरीनाथ जोशी श्री सुनिल इंगळे श्री दुर्गाप्रसाद मिताराव हटवार श्री अशोक मोहिते सुभाष बोराडे सौ.अनुपमा जाधव डॉ सुरेश भिवाजी पाटील कु.श्रुती चौधरी दुर्गा पवार निवघेकर श्री .राकेश साहेबराव वाघ कवयित्री सौ.स्वाती वाल्मिकराव तोंडे पाटील रफीक इमानदार मधुकर पुर्णाजी तराळे गुरुदत्त दिनकर वाकदेकर, मुंबई बबन विठोबा आराख प्रा.डॉ. सत्येंद्र संगाप्पा राऊत मंगेश मुरलीधर दौंडकरराहूल शिवाजी हांडगर डॉ. सौ.अलका नाईक सौ.नंदा विजय सावंत ओंकार शरदचंद्र काकडेदेशमुख,( युवा खेळाडू पुरस्कार २०२६ प्रदान)आयोजक मंडळाने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.शेवटी योगेश हरणे यांनी सर्वांचे आभार मानले.

# मराठवाड्यातील 33/11 के.व्ही. उपकेंद्रांवर सुरक्षा रक्षक तात्काळ नियुक्त करा – तांत्रिक कामगार युनियनची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नागपूर प्रतिनिधी :** तांत्रिक कामगार युनियन यांच्या वतीने लातूर व मराठवाडा प्रादेशिक परिमंडळातील बहुतांश 33/11 के.व्ही. उपकेंद्रांवर सुरक्षा रक्षकांची तात्काळ नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली असल्याची माहिती सरचिटणीस प्रभाकर लहाने यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात दिली आहे.

सदर उपकेंद्रांवर मोठ्या प्रमाणात विद्युत उपकरणे, ट्रान्सफॉर्मर व इतर मौल्यवान साहित्य असल्यामुळे चोरी, तोडफोड किंवा अनधिकृत प्रवेश होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अशा घटना घडल्यास कंपनीला मोठे आर्थिक नुकसान होण्याबरोबरच सार्वजनिक व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होऊ शकतो.संदर्भात संघटनेने यापूर्वीही लेखी पत्रव्यवहार करून प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिली आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

लातूर व मराठवाडा प्रादेशिक परिमंडळातील सद्यस्थिती लक्षात घेता सर्व 33/11 के.व्ही. उपकेंद्रांवर तात्काळ सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, अशी आग्रही मागणी तांत्रिक कामगार युनियन चे केंद्रीय अध्यक्ष दिलीप कोरडे, कार्याध्यक्ष शिवाजी शिवनेचारी, उपाध्यक्ष बी आर पवार, गोपाल गाडगे, सतीश भुजबळ सरचिटणीस प्रभाकर लहाने, उपसरचिटणीस आनंद जगताप, विलास डवर, विलास निमसटकर , केंद्रीय संघटक महेश हिवराळे, आर आर ठाकूर, अरुण यावले, मनोज मोरे, श्रीराम वाकचौरे , राज्य सचिव रघुनाथ तात्या लाड, प्रकाश निकम, संजय उगले , बाळासाहेब काटे, कोषाध्यक्ष गजानन अघम , नितीन चव्हाण, दत्तू भोईर, प्रसिद्धी प्रमुख अनिल सरोदे, महिला प्रतिनिधी शुभांगी मुचडे, विवेक बोरकर, किरण करहाळे, प्रकाश वाघ, विक्की कावळे, प्रदीप पाटील, युवा तांत्रिक कामगार संसद मुख्य समन्वयक देवेंद्र साळुंके यांनी केली आहे.

# निराधार योजनांचे अनेक प्रस्ताव मंजुरीअभावी प्रलंबित

## आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी यांनी प्रश्नावर वेधले शासनाचे लक्ष

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** राज्यातील निराधार योजनांचे अनेक प्रस्ताव मंजुरीअभावी प्रलंबित असल्याचा मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर आणि महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित करून या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले. राज्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, विधवा-परित्यक्ता योजना तसेच दिव्यांग योजना यांमधील लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यासाठी तालुका स्तरावर समित्या गठीत करण्यात येतात. मात्र गडचिरोली, नागपूर, सोलापूर तसेच रायगड जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये अशासकीय समित्या गठीत नसल्याने डिसेंबर २०२५ पर्यंत अनेक निराधारांचे प्रस्ताव मान्यतेविना प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्याची बाब त्यांनी या प्रश्नाच्या माध्यमातून अधोरेखित केली. शासन नियुक्त राजकीय व सामाजिक सदस्य समितीवर नसल्याने मंजूर प्रकरणांचे प्रमाण ९० टक्क्यांवरून ५० ते ६० टक्क्यांपर्यंत खाली आले असून यामुळे अपंग, विधवा व वृद्ध लाभार्थ्यांना लाभापासून वंचित राहावे लागत असून योजनेचा लाभ मिळाला नसल्याने लाभार्थ्यांची आर्थिक अडचण निर्माण झाली आहे या प्रकरणी शासनाने चौकशीच्या अनुषंगाने समिती गठीत करुन लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न दाखल केला होता.

राज्याचे विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, दिनांक २० ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांची निवड करण्याकरीता तालुका स्तरावर "संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती" गठीत करण्यात येते. या समितीवरील अध्यक्ष तसेच अशासकीय सदस्यांच्या नेमणुका संबंधित जिल्ह्यातील मा. पालकमंत्री यांच्या शिफारशीनुसार जिल्हाधिकारी यांचे मार्फत करण्यात येतात. गडचिरोली व सोलापूर या जिल्ह्यातील काही तालुक्यात/नागरी क्षेत्रात संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती गठीत नसल्याने संबंधित जिल्ह्यातील मा. पालकमंत्री यांच्या शिफारसीनुसार समिती गठित करण्याची कार्यवाही सुरु आहे. दि.२० ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-१, नमुना-दोन मधील मुद्दा क्रमांक ४ नुसार ज्या जिल्ह्यामध्ये अशासकीय समिती गठित नसेल अशा जिल्ह्यात संबंधित जिल्हाधिकारी हे तालुकास्तरावर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती स्थापन करतात. संबंधित तालुक्यातील तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा लाभार्थी पात्र-अपात्रतेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यास पालकमंत्री नसल्याने दि.२० ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये संबंधित तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय समितीमार्फत दरमहा लाभार्थी पात्र-अपात्रतेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. शासनाच्या दिनांक १३ मे २०२५ व दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती गठित करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. विशेष सहाय्य योजनेतील डी.बी.टी पोर्टलवर नोंदणी झालेल्या आधार प्रमाणिकृत लाभार्थ्यांना दरमहा डी.बी.टी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. जानेवारी २०२६ अखरे ४७,८८,५४१ इतक्या लाभार्थ्यांना डी.बी.टी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

# निफाड तालुक्यातून कृषी कुंभासाठी ११८ बसेस ; चार दिवसांत शेकडो शेतकरी प्रदर्शनाला जाणार

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आलेल्या कृषी कुंभ प्रदर्शनाचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मिळावा यासाठी निफाड तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने व्यापक नियोजन केले आहे. तालुक्यातील ११८ ग्रामपंचायतींमधील शेतकऱ्यांना प्रदर्शनस्थळी नेण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या ११८ विशेष बसेसची व्यवस्था करण्यात आली असून १२ ते १५ मार्च या कालावधीत चार दिवस हे नियोजन राबविण्यात येणार आहे.निफाड तालुका हा द्राक्ष, कांदा, टोमॅटो, ऊस तसेच इतर नगदी पिकांसाठी ओळखला जातो. या पिकांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नवीन पिक पद्धती, सुधारित बियाणे, कृषी यंत्रसामग्री, तसेच शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी कृषी कुंभ प्रदर्शन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, यासाठी कृषी विभागाने विशेष प्रयत्न सुरू केले आहेत.

> "कृषी कुंभ प्रदर्शनातून आधुनिक शेती तंत्रज्ञान, नवीन पिक पद्धती, कृषी यंत्रसामग्री तसेच विविध शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यामुळे निफाड तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा आणि आपल्या शेती नियोजनासाठी या ज्ञानाचा उपयोग करावा."
>
> — सुधाकर पवार, तालुका कृषी अधिकारी, निफाड

प्रदर्शनासाठी शेतकऱ्यांना ने-आण करण्यासाठी तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीतून बसची व्यवस्था करण्यात आली आहे. संबंधित दिवशी सकाळी ग्रामपंचायत कार्यालयासमोरून बस सुटणार असून शेतकऱ्यांना नाशिक येथे प्रदर्शनस्थळी नेण्यात येईल. दिवसभर प्रदर्शन पाहिल्यानंतर त्याच बसद्वारे शेतकऱ्यांना पुन्हा त्यांच्या गावात सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रवासाबाबत कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी नियोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून ३२ सहाय्यक कृषी अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तालुक्यातील विविध सजांमधील गावांची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली असून ते ग्रामपंचायत स्तरावर शेतकऱ्यांची नोंदणी, माहिती देणे आणि बस नियोजन यासाठी काम करत आहेत. स्थानिक सहाय्यक कृषी अधिकारी तसेच ग्रामपंचायत प्रशासन यांच्या समन्वयातून शेतकऱ्यांची यादी तयार करून त्यानुसार वाहतूक व्यवस्था करण्यात येत आहे.

कृषी कुंभ प्रदर्शनामध्ये आधुनिक शेती तंत्रज्ञान, विविध पिकांवरील सुधारित तंत्रज्ञान, ठिबक व सूक्ष्म सिंचन पद्धती, कृषी यंत्रसामग्री, सेंद्रिय शेती, तसेच कृषी प्रक्रिया उद्योग याबाबत माहिती देणारे विविध स्टॉल उभारण्यात येणार आहेत. याशिवाय राज्य व केंद्र शासनाच्या विविध कृषी योजनांची माहितीही शेतकऱ्यांना येथे मिळणार आहे. तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रात्यक्षिके आणि नव्या संशोधनाची माहिती मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेती नियोजनात आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्यास मदत होणार आहे.

**असे आहे चार दिवसांचे नियोजन**

१२ मार्च : ३१ गावांतील शेतकरी प्रदर्शनाला जाणार

१३ मार्च : ३० गावांतील शेतकरी सहभागी होणार

१४ मार्च : २९ गावांतील शेतकरी भेट देणार

१५ मार्च : २८ गावांतील शेतकरी प्रदर्शन पाहणार

# महिलांच्या कर्तृत्वाला सलाम ; नवीन पनवेलमधील श्री संत साईबाबा प्राथमिक विद्यालयात महिला दिन उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** नवीन पनवेल येथील श्री संत साईबाबा प्राथमिक विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव आणि विद्यार्थ्यांमध्ये स्त्री सन्मानाची भावना रुजविण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाला नगरसेविका अस्मिता घरत, ॲड. सुप्रसिद्ध गायिका सुरेखा भुजबळ, रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगरच्या अध्यक्षा सुनीता चौधरी, माजी मुख्याध्यापिका वैशाली पाटील, डॉ. सिद्धी ठाकूर तसेच माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षा हर्षाली परब यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी शाळेच्या सखी सावित्री समिती व माता-पालक समितीच्या महिला पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.यावेळी उपस्थित मान्यवर महिलांनी थोडक्यात मनोगत व्यक्त करताना शिक्षण, स्वावलंबन आणि समाजनिर्मितीत महिलांची भूमिका अधोरेखित केली. स्त्रियांनी शिक्षणाच्या बळावर समाजात आपले स्थान निर्माण करावे, असा संदेश त्यांनी दिला.




नगरसेविका अस्मिता घरत म्हणाल्या की, स्त्रियांनी खंबीरपणे आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर पुढे जाऊन स्वतःची प्रगती साधली पाहिजे.ॲड. सुप्रसिद्ध गायिका सुरेखा भुजबळ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, स्त्री आणि पुरुष हे दोघेही एकमेकांच्या सहकार्याशिवाय अपूर्ण आहेत. समाजाची प्रगती व्हायची असेल तर पुरुषांनी महिलांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणे गरजेचे आहे. तसेच समाजात महिलांबाबत घडणाऱ्या अन्यायकारक घटनांविरोधात सर्व महिलांनी एकत्र येऊन ठामपणे विरोध करावा व त्याविरुद्ध लढा द्यावा, असा संदेश त्यांनी दिला. यावेळी त्यांनी आपल्या सुमधुर आवाजात "आज मैं ऊपर, आसमा नीचे" हे गीत सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.महिला शिक्षकांमधून प्रतिभा मंडळे यांनी आपल्या मनोगतात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रमाबाई आंबेडकर यांच्या कार्याचा उल्लेख करत महिलांच्या शिक्षण व सन्मानासाठी त्यांच्या योगदानाची आठवण करून दिली. स्त्रियांबाबत असलेला पुरुषी अहंकार अधिक वेदनादायक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच त्यांनी आपल्या गोड आवाजात गीत सादर करून कार्यक्रमात भावनिक वातावरण निर्माण केले.यावेळी सविता शिखरे यांनी "स्त्री बदलत आहे" ही प्रभावी कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. शिक्षकांमधून देविदास गायकवाड, दशरथ म्हात्रे व विजय साईलकर यांनीही समायोजित मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन कुमार मंडळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विजय साईलकर यांनी केले. मुख्याध्यापक वामन खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पुरुष शिक्षकांनी विशेष मेहनत घेत हा कार्यक्रम यशस्वी केला.

# वडिलांचा आधार नसलेल्या युवकाला स्वावलंबनाची संधी – वज्रदेही महिला विकास संघाचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील :** समाजातील गरजू व होतकरू युवकांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने वज्रादेही महिला विकास संघ, वाशिम यांच्या वतीने एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा आरतीताई ठोके यांच्या पुढाकारातून वडिलांचा आधार नसलेल्या एका गरजू युवकाला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदतीचा हात देत त्याच्यासाठी रसवंती व जूस सेंटर सुरू करून देण्यात आले.




सदर युवकाचे वडील सध्या कारावासात असल्यामुळे त्याच्या कुटुंबावर कठीण परिस्थिती ओढवली होती. अशा परिस्थितीत त्या युवकाला स्वावलंबी बनविण्यासाठी वज्रादेही महिला विकास संघाने पुढाकार घेत त्याला रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली.

या उपक्रमामुळे युवकाला स्वतःच्या कष्टावर उभे राहून कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी मोठा आधार मिळणार आहे.समाजातील गरजू व आधारविहीन घटकांना मदत करून त्यांना स्वावलंबी बनविणे हा संस्थेचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या सामाजिक कार्याबद्दल परिसरातून समाधान व्यक्त होत असून वज्रादेही महिला विकास संघाच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# योजनांअंतर्गत करण्यात येणाऱ्या उपचारांचे दरपत्रक जाहीर करा – आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी यांची तारांकित प्रश्नाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी ) :** राज्यात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच हृदय, फुफ्फुस, मूत्रपिंड व बोन मॅरो प्रत्यारोपणासारख्या गंभीर व दुर्मिळ आजारांवरील उपचाराचा खर्च अधिक असल्याने अशा रुग्णांना अतिरिक्त आर्थिक सहाय्य देण्याबाबत राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासंदर्भात प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून राज्यातील रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात उपचार मिळावेत यासाठी या दोन्ही योजनांअंतर्गत करण्यात येणाऱ्या उपचारांचे दरपत्रक जाहीर करण्याची मागणी केली.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेल्या म्हंटले की, अवयव प्रत्यारोपणाच्या रू.५ लाखापेक्षा जास्त खर्च होणाऱ्या ९ दुर्मिळ आजारांवरील उपचारांचा खर्च (रू.९.५ लक्ष ते २२ लक्ष) राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या अधिनस्त असलेल्या राखीव निधीतून करण्यास शासन निर्णय क्र. समिती-२०२५/E-९६४०८७/MJPJAYAB-PMJAY, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत, उपचाराच्या दरांमध्ये रक्त तपासणीपासून रोगाचे निदान होईपर्यंत, एक्स रे पासून ऑपरेशन पर्यंत व रूग्ण (अंगीकृत) रूग्णालयात दाखल झाल्यापासून ते डिस्चार्ज होईपर्यंत होणाऱ्या खर्चाचा समावेश आहे. दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे हृदय, फुफ्फुस व मूत्रपिंड प्रत्यारोपण तसेच बोन मॅरो प्रत्यारोपण यासह नऊ उपचार व शस्त्रक्रियांसाठी उपचार निहाय रू.९.५ लक्ष ते २२ लक्ष या मर्यादेपर्यंत पात्र लाभार्थ्यांना विहित पद्धतीने अर्थसहाय्य केले जाणार आहे. विहीत आरोग्य संरक्षणाच्या मर्यादेबाहेरील एकूण ९ विशेष उपचारांचा खर्च संबंधित रुग्णालयांना राज्य आरोग्य सोसायटीमार्फत राखीव निधीतून देण्याबाबत दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये तरतूद केली आहे. राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या अधिनस्त असलेल्या राखीव निधीतून एकूण ९ अवयव रोपण /प्रत्यारोपण शस्त्रक्रियांच्या विहित खर्चास मान्यता देण्याकरिता प्रमाणित कार्यपध्दती निश्चित करण्याची व त्यादृष्टीने तांत्रिक सुसज्जता करण्याची प्रशासकीय कार्यवाही सध्या सुरु आहे. सदर शासन निर्णयात कारडियॅक लॅबच्या खर्चाचा समावेश नाही, याबाबत स्वतंत्र कार्यवाही करण्यात येईल.

# उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबिन बन्सल यांची रोहिणी घाटावर धडक कारवाई

## २० जण अटकेत ; १ कोटी ४२ लाख ५० हजाराचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी/ जितेंद्र खोडे** : राळेगाव यंत्रणेच्या नाकावर टिच्चून राळेगाव तालुक्यातील रोहिणी घाटावर राजरोसपने अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर पांढरकवडा येथील उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या पथकाने दणका दिला. दिनांक ८ मार्च रोजी रात्री १.३० वाजता छापा टाकून २० जणांना अटक करण्यात आली. यावेळी ११ टिप्परसह २ बोटी,२ पोकलँड मशीन असा एकूण १ कोटी ४२ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.या कारवाईमुळे तालुक्यातील रेती तस्करांचे धाबे चांगलेच दणाणले आहे..



राळेगाव तालुक्यातील रोहिणी येथील वर्धा नदीच्या पात्रातून विनापरवाना वाळूचे उत्खनन करून गोणखणीजाची चोरी करीत असल्याची गोपनीय माहिती पांढरकवडा येथील उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकाला मिळाली.या माहितीच्या आधारे उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबिन बन्सल व त्यांच्या पथकाने रोहिणी घाटावर छापा टाकला. या कारवाईत ११ टिप्पर सह २ बोटी, २ पोकलँड मशीन असा एकूण एक कोटी ४२ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अवैध वाळूसाठा व उत्खननाकरिता व वाळूचे वाहतुकी करिता वापरलेली वाहने जप्त करून वडकी पोलीस ठाण्यात लावण्यात आली आहे.ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता,अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या पथकाने केली आहे.

# निफाडमध्ये 'नाशिक ग्रंथोत्सव २०२५'चे आयोजन; वाचन संस्कृतीला चालना देण्याचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांमध्ये वाचन संस्कृती दृढ व्हावी या उद्देशाने राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नाशिक आणि श्री माणकेश्वर सार्वजनिक वाचनालय, निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने 'नाशिक ग्रंथोत्सव २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. हा ग्रंथोत्सव १० मार्च रोजी निफाड येथील कृषी उत्पन्न बाजार समिती (मार्केट कमिटी हॉल) येथे सुरू होणार आहे.ग्रंथोत्सवाची सुरुवात १० मार्च रोजी सकाळी ९ वाजता श्री माणकेश्वर सार्वजनिक वाचनालय येथून भव्य ग्रंथ दिंडीने होणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती (मार्केट कमिटी हॉल) येथे मान्यवरांच्या हस्ते ग्रंथोत्सव २०२५ व ग्रंथ दालनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यावेळी नाशिक जिल्ह्यातील पुरस्कारप्राप्त ग्रंथालयांचा सन्मान करण्यात येणार आहे.ग्रंथोत्सवाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक व साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. १० मार्च रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत निमंत्रित कवींचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.११ मार्च रोजी सकाळच्या सत्रात १०.३० ते १२.३० या वेळेत 'सोशल मीडिया व आजची युवा पिढी' या विषयावर परिसंवाद होणार आहे. दुपारच्या सत्रात 'वंदे मातरम्' कार्यक्रमासह वाचकांचा सत्कार केला जाणार आहे. त्यानंतर 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर – लोककल्याणाचा आदर्श' या विषयावर युवा भारूडकर मयूर देशमुख यांचा भारूड व प्रबोधनपर कार्यक्रम सादर होणार आहे. सायंकाळी ४ वाजता ग्रंथोत्सवाचा समारोप होणार आहे.ग्रंथप्रेमींना या सर्व कार्यक्रमांचा विनामूल्य आस्वाद घेता येणार आहे. तसेच पुस्तक विक्रेते, वितरक आणि प्रकाशक यांच्यासाठी पुस्तक विक्रीसाठी स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वाचकांना दर्जेदार पुस्तके उपलब्ध व्हावीत आणि ग्रंथ विक्रेत्यांना विक्रीसाठी आवश्यक सुविधा मिळाव्यात हा या ग्रंथोत्सवाचा प्रमुख उद्देश असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील जगताप यांनी दिली आहे.जर हवे असेल तर मी ही बातमी अजून अधिक "पेपर स्टाइल" (लोकमत / सकाळ सारखी) छोट्या परिच्छेदातही तयार करून देऊ शकतो.

## वेताळवाडी किल्ल्यावर पहिल्यांदाच शिवरायांचा राजेशाही अभिषेक; सोयगावकरांचा पायी पालखी सोहळा



**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** तिथीनुसार साजऱ्या करण्यात येणाऱ्या शिवजन्मोत्सवानिमित्त सोयगाव येथे वेताळवाडी किल्ल्यावर पहिल्यांदाच छत्रपती शिवाजी महाराजांचा राजेशाही अभिषेक सोहळा पार पडला.सोयगाव येथील शिवभक्तांनी पायी पालखी सोहळा काढत गडावर वैदिक मंत्रोच्चारात दुग्धाभिषेक करून शिवरायांना अभिवादन केले. समर्पण फाउंडेशनच्या वतीने आयोजित या उपक्रमात सोयगावच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सकाळी आठ वाजता शोभायात्रेला प्रारंभ झाला.भालदार-चोपदार, भगवे ध्वज,पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात शेकडो शिवभक्त पायी वेताळवाडी किल्ल्याकडे रवाना झाले.गडावर पोहोचल्यानंतर वैदिक मंत्रोच्चारात छत्रपती शिवाजी महाराजांचा दुग्धाभिषेक करण्यात आला.त्यानंतर विधीवत शस्त्रपूजनही पार पडले. या सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.कार्यक्रमात बोलताना शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानचे धारकरी जसवंत सिंह यांनी समाजातील एकजूट आणि हिंदवी स्वराज्याच्या विचारांची जपणूक करण्याचे आवाहन केले. तर आरएसएस स्वयंसेवक कल्पेश जोशी यांनी शिवचरित्र समजून घेण्यासाठी खरा इतिहास जाणून घेण्याची गरज व्यक्त केली.गडकोटांचे संवर्धन आणि संरक्षणासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा,असे मत भागीनाथ शिरके यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाला आरएसएसचे कल्पेश जोशी, राजेशिवबा प्रतिष्ठानचे भागीनाथ शिरके,राजा शिवछत्रपती परिवाराचे भरत बोचरे,सह्याद्री प्रतिष्ठानचे डॉ. पवन गिरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# "महिलांच्या कर्तृत्वाला मानाचा मुजरा"

## संभाजी ब्रिगेडचा पुढाकार; अर्जुन पाटील खरात यांच्याकडून प्रेरणादायी सन्मान

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड (वाशीम)जागतिक महिला दिनानिमित्त रिसोड येथे महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा प्रेरणादायी सन्मान सोहळा पार पडला. संभाजी ब्रिगेडच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करून त्यांच्या कार्याला मानाचा मुजरा देण्यात आला.

या कार्यक्रमात संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष तथा सिटी न्यूजचे मुख्य संपादक अर्जुन पाटील खरात यांच्या हस्ते रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, ॲडव्होकेट नूतन भराड तसेच वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत महिला डॉक्टरांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



समाजातील विविध क्षेत्रांत महिलांनी आपल्या कर्तृत्वाची ठसा उमटवला असून प्रशासन, न्यायव्यवस्था आणि आरोग्य क्षेत्रात महिला सक्षमपणे जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा आणि इतर महिलांनाही पुढे येण्यासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला.कार्यक्रमात उपस्थितांनी महिलांच्या कार्याचा गौरव करत समाजाच्या प्रगतीसाठी महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले. महिलांनी शिक्षण, प्रशासन, न्यायव्यवस्था आणि सामाजिक क्षेत्रात पुढे येऊन समाज घडविण्यात मोलाची भूमिका बजावली आहे, असेही यावेळी नमूद करण्यात आले.या कार्यक्रमाला संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला दिनाच्या निमित्ताने झालेल्या या सन्मान सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

**महिलांनी शिक्षण, प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रात आत्मविश्वासाने पुढे येणे आवश्यक आहे. आज महिला प्रत्येक क्षेत्रात सक्षमपणे जबाबदाऱ्या पार पाडत असून समाजाच्या प्रगतीत त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.**

**— प्रतीक्षा तेजनकर, तहसीलदार रिसोड**

**महिलांनी कायद्याचे ज्ञान घेऊन न्यायव्यवस्थेत अधिकाधिक सहभाग नोंदवावा. महिला सक्षम झाल्या तर समाज अधिक सशक्त आणि न्याय्य होईल.**

**— ॲड. नूतन भराड**

**महिला ही कुटुंब आणि समाजाची आधारस्तंभ आहे. महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान केल्याने इतर महिलांनाही पुढे येण्याची प्रेरणा मिळते आणि समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करतो.**

**— अर्जुन पाटील खरात**
**मुख्य संपादक, रिसोड सिटी न्यूज**

## विशेष शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत दिनांक ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन विविध उपक्रमांद्वारे उत्साहात साजरा करण्यात आला.

संपूर्ण जगभर ८ मार्च रोजी महिलांच्या सन्मानार्थ जागतिक महिला दिन साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर शाळेत अभिनव उपक्रम राबवत समाजातील उपेक्षित घटकांना मदत करणाऱ्या आणि विशेष शाळेला सातत्याने सहकार्य करणाऱ्या पनवेलमधील पाच कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.

यामध्ये आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. समिता सोमण, रिलायन्स फाउंडेशन स्कूलच्या विशेष शिक्षिका सौ. श्रद्धा जोशी, सेंट थॉमस शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सानिका कुलकर्णी, शाळेच्या हितचिंतक डॉ. सौ. शुभांगी पत्की तसेच शाळेच्या माजी विद्यार्थ्याच्या पालक व हितचिंतक सौ. आशा गेंगजे यांचा समावेश होता. विद्यार्थिनींच्या हस्ते त्यांच्या कार्यस्थळी जाऊन सन्मानचिन्ह देऊन शाळेतर्फे त्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी शाळेत विद्यार्थ्यांनी ग्रीटिंग व फुले देऊन शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी भाषणातून आपल्या भावना व्यक्त केल्या, तर शिक्षकांनी महिला दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. दृकश्राव्य माध्यमातूनही या दिवसाची माहिती सोप्या भाषेत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली.

तसेच महिला दिनानिमित्त विद्यार्थिनींना मासिक पाळीदरम्यान घ्यावयाच्या स्वच्छतेविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शिक्षकांनी अशा दिवसांमध्ये शाळेत कोणती काळजी घ्यावी याबाबतही माहिती दिली. विद्यार्थिनींना सेनेटरी पॅडचे वाटपही करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात स्व-सुरक्षा, स्वतःची काळजी घेणे, तसेच समाजातील विविध भूमिका निभावणाऱ्या महिलांविषयी आदर, सन्मान आणि संरक्षणाची भावना रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला.



## साई श्रद्धा हॉस्पिटल, यवतमाळ येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागाव यवतमाळ** : जागतिक महिला दिनानिमित्त शहरातील साईश्रद्धा हॉस्पिटल येथे महिला दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे आयोजन हॉस्पिटलच्या संचालिका डॉ पूजा विजय मुन यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या सर्व महिला कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन आणि शाल घालून सन्मान करण्यात आला.कार्यक्रमात



बोलताना डॉ. पूजा विजय मून यांनी सांगितले की, आरोग्य सेवेमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचारी रुग्णसेवेत मोठी भूमिका बजावत असून त्यांच्या समर्पणामुळेच रुग्णांना उत्तम सेवा मिळते.या प्रसंगी महिला कर्मचाऱ्यांनीही आपले अनुभव व्यक्त केले. कार्यक्रमामुळे हॉस्पिटलमध्ये आनंदी आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व महिला कर्मचाऱ्यांचे आभार मानून महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

## सासरी निवडणुकी मध्ये निवडून आलेल्या लेकीचे माहेरी कौतुक : अख्या गावाने केला नागरी सत्कार

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे** : सोयगाव जिल्हा परिषद,पंचायत समितीच्या निवडणुकी मध्ये घोसला येथील निंबायती गणात एकहाती विजय मिळविलेल्या शिंवसेनेच्या पंचायत समिती सदस्य सविताताई गव्हांडे यांचा शुक्रवारी (ता.०६) जामनेर तालुक्यातील निमखेडी या गावात माहेरच्या ग्रामस्थांनी नागरी सत्कार करून कौतुक सोहळा आयोजित केला यावेळी निमखेडी( ता जामनेर) गावाच्या सरपंच पल्लवी पाटील यांनी नागरी सत्कार केला प्रमुख उपस्थिती पी के पाटील,जे के चव्हाण,मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान गव्हांडे, जिल्हाध्यक्ष विजय काळे,सविता गव्हांडे, मा.सभापती चंद्रकांत पाटील,प्रकाश



गव्हांडे,मिनाबाई पाटील,पोलीस पाटील स्वप्निल पाटील,प्रकाश गव्हांडे, अमोल पाटील,राजू सर,गोकूळ पाटील(माजी सरपंच) भूषण पाटील, महिला डेअरी उपाध्यक्ष सविता पाटील, आदींची उपस्थिती होती.पंचायत समितीच्या सदस्य सविता गव्हांडे यांचा -संगीता पाटील,वत्सला पाटील,यमुना पाटील,कविता पाटील,वैशाली बोधारे,वर्षा सोळुंके,आदींसह महिला, पुरुषांनी नागरी सत्कार केला..

## महापौर नितीन पाटील यांचा समाजाभिमुख निर्णय ; मानधन व भत्ते 'महापौर सहाय्यता निधी'त करणार जमा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** समाजहित आणि नागरिकांच्या आरोग्याप्रती आपली कटिबद्धता जपत पनवेल महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील यांनी एक अत्यंत आदर्शवत आणि महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे. महापौर पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर, आपल्याला मिळणारे सर्व प्रकारचे मानधन आणि भत्ते 'महापौर सहाय्यता निधी'मध्ये जमा करण्याचा निर्णय त्यांनी घेतला असून, या निर्णयाचे सर्व स्तरांतून उत्स्फूर्त स्वागत आणि कौतुक होत आहे.

एका जबाबदार लोकप्रतिनिधीने अशा प्रकारे स्वतःच्या हक्काच्या मानधनाचा त्याग करून तो निधी समाजकार्यासाठी खर्च करणे, हा पनवेलमधील एक नवा आणि स्तुत्य पायंडा मानला जात आहे. महापौर नितीन पाटील यांनी स्पष्ट केले की, महानगरपालिका अधिनियमान्वये महापौरांना मिळणारे प्रतिमाह मानधन, बैठक




भत्ता, स्वीय सहायकाचे मानधन आणि वाहन भत्ता ही सर्व रक्कम आता थेट 'महापौर सहाय्यता निधी'त वर्ग केली जाणार आहे. हा निर्णय घेण्यामागे केवळ आणि केवळ समाजहित हाच मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषतः गोरगरीब नागरिकांना भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक समस्या आणि इतर आपत्कालीन परिस्थितीत त्यांना तातडीने आर्थिक दिलासा मिळावा, या उदात्त हेतूने त्यांनी हा निर्णय घेतला आहे

# जमीन मालकाला न विचारता आदेश कसा ? आझाद मैदानात न्यायासाठी आमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** जमीन मालकाला विचारात न घेता मध्ये शिरूरचे तत्कालीन तहसीलदार रणजित भोसले यांनी आदेशात गटाचा उल्लेख करून पाण्यासाठी पाट खुला करण्याचा निर्णय कसा दिला ? या प्रश्नासाठी शेतकऱ्यांनी आझाद मैदानात आमरण उपोषण सुरू केले आहे. सामाजिक कार्यकर्ते अशोकराव टाव्हरे यांनी आंदोलनास पाठींबा दिला आहे.

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील तान्हाजी जानकीराम कुरंदळे, सुखदेव जानकीराम कुरंदळे, कर्डेलवाडी ता.शिरूरचे सरपंच संतोष कर्डीले, अतुल कुरंदळे, शिवाजी कुरंदळे यांनी आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण सुरू केले आहे.

मामलेदार ॲक्ट १९०६ चे कलम ५ अन्वये संबधित मालकी असलेल्या अण्णापुर, ता.शिरूर.जि.पुणे येथील जमीन गट नं ३४६२ च्या शेतकऱ्यांना




प्रतिवादी केलेले नसताना सन २०१७ मध्ये शिरूरचे तत्कालीन तहसीलदार रणजित भोसले यांनी आदेशात गटाचा उल्लेख करून पाण्यासाठी पाट खुला करण्याचा निर्णय कसा दिला ?

बबन दगडु कुरंदळे यांनी तहसीलदार शिरूर यांचेकडे मामलेदार कोर्ट ॲक्ट १९०६ चे कलम ५ अन्वये पाण्याचा पाट खुला करण्यासाठी सन २०१७ मध्ये अर्ज केला होता. सदर प्रकरणी बबन कुरंदळे याने अण्णापुर येथील जमीन गट नं ३४६२,३४६३,३४६६ मधून परवानगी देण्याची मागणी केली होती. त्याच्या मालकीचा गट नं ३४६४ व ३४६७ आहे. तहसीलदार शिरूर यांनी सदर जमीन गटाचे ७/१२ चे अवलोकन न करता,मालक कोण आहे हे न पाहता किंवा त्यांना प्रतिवादी करण्याचा आदेश न देता तान्हाजी कुरंदळे व सुखदेव कुरंदळे यांच्या मालकीच्या जमीन गट नं ३४६२ मधून पाट खुला करण्याचा आदेश पारित करून लोकशाहीला काळीमा फासला आहे. जानेवारी २०२६ मध्ये इतर गटमालकांना नोटीस आली तेव्हा त्यांना समजले की त्यांच्या गटातून पाट खुला करून दिला जाणार आहे.

याबाबत मा.उच्च न्यायालयाने रिट याचिकेमध्ये आदेश पारित केला आहे व त्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही म्हणून बबन कुरंदळे यांनी अवमानना याचिका क्र ०१/२०२६ दाखल केली आहे व त्यामध्ये मा.न्यायालयाने सरकारी वकीलांना सद्यस्थिती कळविण्याबाबतचा आदेश पारित करून दि.१७ फेब्रुवारी २०२६ रोजी आदेश पारित करून दि.१० मार्च २०२६ रोजी पुढील सुनावणी ठेवली आहे.

अण्णापुर ता.शिरूर. जि.पुणे येथील जमीन गट नं ३४६२ चे मालक असताना,तहसीलदार व मा.उच्च न्यायालयात प्रतिवादी केले नसल्याने संबधित न्यायालयांचे आदेश त्यांना लागु होऊ शकत नाही असे ॲड विवेक पवार यांनी म्हटले आहे.

गट नं ३४६२ तान्हाजी व सुखदेव कुरंदळे यांच्या मालकीचा व वहिवाटीचा असताना व प्रतिवादी नसताना तहसीलदार शिरूर यांनी बेकायदेशीरपणे गैरकृत्य करून आदेशात सदर गट नंबरचा उल्लेख केला ही बाब गंभीर आहे,त्यामुळे तत्कालीन तहसीलदार रणजित भोसले यांना तातडीने सेवेतून बडतर्फ करावे.तसेच दि.११/०३/२०२६ रोजी वा नंतर होत असलेल्या पाट खुला करण्याच्या प्रक्रियेतून गट नं ३४६२ वगळावा अशी मागणी आंदोलकांची आहे.

## निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघातर्फे जागतिक महिला दिन साजरा




**दैनिक युवक आधार**

**माहूर (प्रतिनिधी)/सय्यद ईसा** : निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघटनेतर्फे शासकीय ग्रामीण रुग्णालय येथे तेथील महिला अधिकारी तथा कर्मचारी यांचा जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आला. यावेळी छोटेखानी कार्यक्रमाचे अध्यक्ष निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माहूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अध्यक्ष ओमप्रकाश साबळे हे होते तर मंचावर युवा उद्योजक रंजीत तेलेवार आणि तालुकाध्यक्ष अनिल माडपेलीवार यांची उपस्थिती होती. समवेत तालुका उपाध्यक्ष समाधान कांबळे, शहराध्यक्ष कुंदन तीवडकर, सदस्य अंबादास मुकटे, गोपाल चव्हाण, गोपाल नाईक, संजय वडसकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षण परिषदेचे एस एस पाटील सर यांनी केले, प्रास्ताविक तालुकाध्यक्ष अनिल माडपेलीवार यांनी केले, उपस्थित महिला वर्गातून डॉ. अंबेकर मॅडम यांनी जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छापर आपले मनोगत व्यक्त केले, अध्यक्षीय समारोप गणेश कचकलवार सर यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षण परिषदेचे एस एस पाटील यांनी केले.

# कटकवार विद्यालयात पर्यावरणपूरक होळी, स्वच्छता अभियान तसेच विविध स्पर्धांचे आयोजन

**भावेश धंधुकीया/भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : साकोली येथील कृष्णमूरारी कटकवार विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय साकोली येथे पर्यावरण सेवा योजना 6.0 तसेच इको क्लब फॉर लाईफ मिशन व राष्ट्रीय हरित सेना अंतर्गत असलेल्या जयंत कटकवार ग्लोबल नेचर क्लब तर्फे सलग 18 व्या वर्षी पर्यावरणपूरक होळीचे प्राचार्य बी एस लंजे, शिक्षिका पुष्पा बोरकर, अंजना रणदिवे,प्रा. शीतल साहू, रोहित पारधी, कु. हातझाडे मॅडम तसेच पळसकर मॅडम व ज्ञानेश्वर हुलकाने व प्रा. जागेश्वर तिडके यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला. यावेळी हरित सेना व नेचर क्लब सदस्यांनी गार्डन मध्ये स्वच्छता अभियान राबवून केरकचरा जमा केला.

त्यानंतर केरकचऱ्याचे प्रज्वलन करण्यापूर्वी वृक्षपूजन करण्यात आल्यानंतर प्राचार्य बी एस लंजे सर यांनी होळीचे प्रज्वलन केले..यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी "नका करू रे लाकडाची होळी करा स्वच्छता अभियान व ग्रामसफाई आणि करा होळी इकोफ्रेंडली पर्यावरणस्नेही असा एकच उद्घोष करून पर्यावरणपूरक होळी सण साजरा केला.

यावेळी प्रास्ताविक करताना प्रा. अशोक गायधने सर याी पर्यावरण पूरक होळीची का आवश्यकता यावर सोदाहरण मार्गदर्शन केले. त्याचबरोबर चंद्रग्रहणाचे व सूर्यग्रहणाबद्दल असलेल्या अंधश्रध्दा व गैरसमज दूर करून हा केवळ सावलीचा खेळ असे वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करून पटवून दिले. नेचर क्लब सक्रिय शिक्षिका पुष्पा बोरकर यांनी पर्यावरण आरतीचे गायन करून वातावरणात चैतन्य निर्माण केले.प्राचार्य बी. एस.लंजे सर यांनी पर्यावरण होळीनिमित्ताने पर्यावरण संवर्धन तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत करण्याचे आवाहन केले. प्रमुख मार्गदर्शन आटोपल्यावर साकोली व परिसरात भागात कार्यरत असणारे सर्पमित्र व निसर्गमित्र युवराज बोबडे, रोशन बागडे, सुरेंद्र राऊत, अमीन चौधरी, समीर राऊत जतिन चुन्ने, निशांत आतीलकर या निसर्ग शौर्यवीरांचा पदक व प्रमाणपत्र प्राचार्य सरांच्या हस्ते देऊन सत्कार करण्यात आला. सर्पमित्र रोशन बागडे याची नॅशनल डिटेक्टीव फोर्स मध्ये ऑफिसर म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्याचे विशेष अभिनंदन यावेळी करण्यात आले.यानंतर जयंत कटकवार ग्लोबल नेचर क्लब तर्फे आयोजित वर्षभर झालेल्या विविध 20 पेक्षा जास्त स्पर्धांची पारितोषिके व प्रमाणपत्र प्रमुख अतिथीच्या हस्ते देण्यात आली. त्यानंतर ग्लोबल नेचर क्लबचे शालेय पदाधिकारी संघदीप तरजुले,वंश फंदे,गुंजन भांडारकर, ईशांत येरणे,चिराग साखरे, सुयोग तरजुले यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. शीतल साहू व पळसकर मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन काजल शेंदरे, प्रेरणा पोगळे, जानवी सावरकर, शेजल पातोडे यांनी केले. यावेळी नैसर्गिक कोरडे व ओले रंग तसेच पर्यावरणस्नेही होळी संदेश फलक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या नैसर्गिक रंग कोरडे व ओले रंग बनवा स्पर्धेत मिडलस्कुल गटात प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक अनुक्रमे सुयोग तरजुले, अंश घोरमारे,वंश पळसकर, मयंक कटनकर ,अयान कवासे,मयंक भरणे , भूषण उके , रजनी टेंभुरकर, स्वराली कापगते यांना तर हायस्कूल गटात चाहत अरकासे, भार्गवी आमडारे,तृषा जांभूळकर, जिया वल्के , भैरवी बोरकर, दुर्वांशा चव्हाण यांना तर ज्युनिअर गटात प्रेरणा पोगळे, भूमाला बडवाईक, जानवी सावरकर यांना प्राप्त झाला.

होळी फलक लेखन संदेश स्पर्धामध्ये ज्युनिअर गटात प्रेरणा पोगळे, भुमाला बडवाईक, मिडलस्कुल गटात अंश घोरमारे, गौरी बोरकर यांना गटातून प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. वरील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात आले.तसेच होळीनिमित्त स्वच्छता अभियान राबविणारे ग्लोबल नेचर क्लब साकोलीचे विद्यार्थी अध्यक्ष संघदीप तरजुले, उपाध्यक्ष वंश फंदे,सचिव ईशांत येरणे,सहसचिव गुंजन भांडारकर,कार्याध्यक्ष चिराग साखरे व सुयोग तरजुले तसेच सक्रिय सदस्य अंश घोरमारे, मयंक भरणे आणि भूषण उके यांनी स्वच्छता अभियान व कार्यक्रम नियोजनास मदत केली त्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य बी.एस.लंजे,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय तांडे, रोहित पारधी, दिनेश उईके, नीलिमा गेडाम, संजय पारधी,शिवदास लांजेवार, पुष्पा बोरकर, अंजना रणदिवे, शिक्षिका कु. हातझाडे, ज्ञानेश्वर हुलकाने, प्रा. केशव कापगते, प्रा. विनोद हातझाडे,प्रा. राजेश भालेराव,प्रा. प्रशांत शिवणकर, प्रा. ज्ञानेश्वर लांजेवार,प्रा. शीतल साहू,प्रा. जागेश्वर तिडके,प्रा. नरेंद्र भदाडे,प्रा. कमलेश मडकवार,प्रा. स्नेहल मते,प्रा.कुंदा नेवारे,प्रा.कृष्णा बिसेन, शिक्षकेत्तर कर्मचारी विनोद वाघाये खुशाल उके, ग्रंथपाल हेमराज ठाकरे,पीयूष मेश्राम व इतर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## 'मॉलिक्युलर बायोलॉजीतील साधने व तंत्रे' विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा –विद्यापीठ पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक** : नागपूर विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्राणीशास्त्र विभागात 'मॉलिक्युलर बायोलॉजीतील साधने व तंत्रे' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा २३ व २४ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली.

माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या कार्यशाळेत पदवी, पदव्युत्तर विद्यार्थी तसेच संशोधकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संशोधन क्षेत्रात महत्त्वाच्या ठरणाऱ्या मॉलिक्युलर बायोलॉजीतील विविध साधने व तंत्रांची सखोल माहिती देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.कार्यशाळेची सुरुवात प्राणीशास्त्र विभाग प्रमुख तथा कार्यक्रम संयोजक डॉ. (सौ.) व्ही. टी. धुर्वे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले रुसा समन्वयक डॉ. रुपेश बडेरे यांनी उद्घाटनपर मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी विविध वैज्ञानिक क्षेत्रांमध्ये मॉलिक्युलर बायोलॉजी तंत्रांचे वाढते महत्त्व अधोरेखित




केले आणि विद्यार्थ्यांना व संशोधकांना नवनवीन तंत्रज्ञानाबाबत सतत जिज्ञासू राहण्याचे आवाहन केले.

या दोन दिवसीय कार्यशाळेत हायमीडिया लॅबोरेटरीज येथील अनुभवी प्रात्यक्षिककार डॉ. सुनील कोकणे व डॉ. संजीव कुमार सिंह यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी रँडम ॲम्पिफिकेशन ऑफ पॉलिमोर्फिक डीएनए (आरएडीपी) आणि रिस्ट्रिक्शन फ्रॉगमेंट लेंथ पोलिमरायझेशन (आरएफएलपी) यासारख्या महत्त्वाच्या तंत्रांबद्दल सविस्तर माहिती देत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सादर केली. तसेच प्राणीशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. उर्मिला जीवनतारे आणि डॉ. आशिककुमार नागवंशी यांनी सिकलसेल ॲनिमिया चाचणीचे प्रात्यक्षिक करून दाखवले, तर कु. धारिता जोशी आणि कु. पल्लवी मोहुरले यांनी अपोप्टोसिस चाचणीचे प्रात्यक्षिक सादर केले.

या कार्यशाळेदरम्यान सहभागी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग व प्रात्यक्षिकांद्वारे मौल्यवान व्यावहारिक अनुभव मिळाला. डॉ. कोकणे यांनी प्रत्येक तंत्राच्या सैद्धांतिक बाबींचे स्पष्टीकरण दिल्यानंतर त्याचे टप्प्याटप्प्याने प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना प्रयोग प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेता आला. कार्यशाळेचा एक भाग म्हणून सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील रुसा केंद्राला भेट देण्याची संधी मिळाली. येथे अत्याधुनिक प्रयोगशाळा उपकरणे आणि संशोधनासाठी वापरल्या जाणाऱ्या यंत्रसामग्रीचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले. तज्ज्ञांनी या उपकरणांचे कार्य, उपयोग आणि आधुनिक संशोधनातील त्यांचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करीत आभार डॉ. आशिककुमार नागवंशी यांनी मानले.

# पोहरा येथे भव्य 'एच. पी. व्ही. लसीकरण मोहिमेचा प्रारंभ

**भावेश धंधुकीया**

**भंडारा जिल्हा प्रतिनिधी :** प्राथमिक आरोग्य केंद्र पोहरा यांच्या वतीने शासनाच्या ध्येयधोरणानुसार जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला दिन साजरा करून एच. पी. व्ही.लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.ग्रामीण भागातील मुलींचे आरोग्य सुरक्षित करण्याच्या उद्देशाने, पोहरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने HPV (ह्युमन पॅपिलोमाव्हायरस) लसीकरण मोहिमेचा अत्यंत उत्साहात शुभारंभ करण्यात आला. गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचा धोका टाळण्यासाठी ही लस अत्यंत प्रभावी मानली जात असून, या उपक्रमामुळे परिसरात आरोग्याप्रती जनजागृती निर्माण झाली आहे.या विशेष मोहिमेचे उद्घाटन भंडारा जिल्हा परिषदेच्या सदस्या सौ. विद्या कुंभरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोहरा गावचे सरपंच रामलाल पाटणकर होते. प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. स्नेहल गजभिये आणि डॉ.




स्नेहा घडले यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रणय सहदेवकर यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, "HPV विषाणू हा गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे मुख्य कारण आहे. १४ वर्ष पूर्ण झालेली व १५ वर्षे पूर्ण व्हायच्या आतील मुलींना ही लस दिल्यास त्यांच्या शरीरात या विषाणूविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण होते. ग्रामीण भागात या लसीबद्दलचे गैरसमज दूर करून जास्तीत जास्त मुलींना सुरक्षित करणे हे आमचे उद्दिष्ट आहे."उद्घाटक विद्या कुंभरे यांनी पालकांना आवाहन करताना सांगितले की, "आरोग्य विभाग आपल्या दारी येत आहे, तेव्हा पालकांनी संकोच न बाळगता आपल्या मुलींचे लसीकरण पूर्ण करून घ्यावे. ही लस मुलींच्या सुदृढ भविष्याची गुरुकिल्ली आहे." सरपंच रामलाल पाटणकर यांनीही गावकऱ्यांना या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन औषध निर्माण अधिकारी भूमेश राऊत यांनी केले तर आभार किरण साळवे यांनी व्यक्त केले. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी आरोग्य विभागाच्या पथकाने विशेष नियोजन केले आहे. यामध्ये बी. एच. मेश्राम, कु.खेडीकर आणि दीपा रामटेके यांनी तांत्रिक व प्रशासकीय जबाबदारी सांभाळली. आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी आणि आशा सेविकांनी घरोघरी जाऊन पालकांचे समुपदेशन करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.या मोहिमेअंतर्गत पोहरा आणि परिसरातील पात्र मुलींना टप्प्याटप्प्याने लस दिली जाणार आहे.प्राथमिक आरोग्य केंद्राच्या या पुढाकाराचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, कर्करोगमुक्त समाजाच्या दिशेने पोहरा गावाने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

## निफाडमध्ये ‘सखीरंग उत्सव’ उत्साहात; महिला दिन व रंगपंचमीचा दुहेरी आनंद



**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : जागतिक महिला दिन आणि रंगपंचमीचे औचित्य साधून निफाड शहरातील प्रभाग क्रमांक १२ मध्ये माजी नगरसेवक देवदत्त कापसे यांच्या देवदत्तभाऊ कापसे युवा मंचच्या वतीने आयोजित करण्यात आलेला “सखीरंग उत्सव” महिलांच्या उत्स्फूर्त सहभागात आनंदात संपन्न झाला.

रविवारी (दि. ८ मार्च २०२६) दुपारी ४.०० ते सायंकाळी ६.३० या वेळेत पार पडलेल्या या कार्यक्रमात परिसरातील महिला व युवती मोठ्या संख्येने उपस्थित राहून रंगपंचमीचे रंग आणि महिला दिनाचा उत्साह एकत्र साजरा केला.कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित महिलांच्या स्वागताने करण्यात आली. यावेळी महिलांनी एकमेकींना रंग लावत मैत्री, प्रेम आणि आपुलकीचे रंग उधळले. विविध मनोरंजनात्मक खेळ, सांस्कृतिक उपक्रम आणि उत्साहवर्धक कार्यक्रमांमुळे परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

महिलांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेत नृत्य, खेळ आणि विविध उपक्रमांचा मनमुराद आनंद घेतला. या उपक्रमामुळे महिलांना एकत्र येऊन आनंद साजरा करण्याची तसेच परस्परांतील मैत्री अधिक दृढ करण्याची संधी मिळाली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी देवदत्तभाऊ कापसे युवा मंचच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित महिलांनीही या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा कार्यक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

महिला दिन आणि रंगपंचमीचा दुहेरी आनंद देणारा ‘सखीरंग उत्सव’ महिलांसाठी आनंददायी व संस्मरणीय सोहळा ठरला.

# दैनिक युवक आधारचा पुन्हा इशारा :

## मालेगाव–आमखेडा रस्ता अजूनही मृत्यूचा सापळाच; प्रशासन झोपेतच का?”

## बोरगाव–पिंपळा–आमखेडा मार्गाची भीषण अवस्था; नागरिकांचा संताप शिगेला

### तातडीने रस्ता दुरुस्ती करण्याची जोरदार मागणी

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशिम जिल्हा प्रतिनिधी :** मालेगाव (वाशिम) – ग्रामीण भागातील जीवनवाहिनी मानला जाणारा बोरगाव–पिंपळा–आमखेडा मार्गासह मालेगाव–आमखेडा हा महत्त्वाचा रस्ता आजही अक्षरशः मृत्यूचा सापळा बनून उभा आहे. या मार्गाची अवस्था इतकी भीषण झाली आहे की, ती शब्दात वर्णन करणेही कठीण झाले आहे. ठिकठिकाणी पडलेले प्रचंड खड्डे, पूर्णपणे उखडलेला डांबराचा थर आणि रस्त्यावरील असमान पृष्ठभागामुळे नागरिकांचा जीव अक्षरशः धोक्यात आला आहे.

या गंभीर समस्येबाबत दैनिक युवक आधारने यापूर्वी अनेकदा ठळक वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मात्र, वारंवार प्रसिद्धी होऊनही सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित यंत्रणा अजूनही निष्क्रिय असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना तीव्र होत आहे.

विशेषतः बोरगाव–पिंपळा–आमखेडा दरम्यानचा रस्ता अत्यंत धोकादायक बनला असून वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. दुचाकीस्वारांना अचानक खड्ड्यांचा अंदाज न आल्याने






अपघाताचा धोका वाढला आहे, तर चारचाकी वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. रात्रीच्या वेळी परिस्थिती आणखी भीषण बनते.

या मार्गावरून दररोज शेकडो शेतकरी, विद्यार्थी, कामगार आणि व्यापारी प्रवास करतात. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तसेच शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे नागरिकांना मानसिक त्रासासोबत आर्थिक नुकसानही सहन करावे लागत आहे.

स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित विभागाकडे तक्रारी केल्या, निवेदने दिली, तरीही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासन एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**बोरगाव–पिंपळा–आमखेडा हा रस्ता इतका बेकार आणि धोकादायक झाला आहे की, त्याची अवस्था शब्दातही व्यक्त करता येत नाही. नागरिकांचा जीव धोक्यात घालणाऱ्या या मार्गाची तातडीने दुरुस्ती न झाल्यास भविष्यात गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, अशी तीव्र भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.**

**“मालेगाव–आमखेडा रस्ता मृत्यूचा सापळा बनूनही प्रशासन गप्प का?**

**वारंवार बातम्या प्रसिद्ध होऊनही सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वरिष्ठ अधिकारी अजूनही निष्क्रिय का?**

**नागरिकांचा जीव धोक्यात असताना जबाबदार यंत्रणा जागी होणार तरी कधी?”**

नागरिकांच्या मते, या रस्त्याची केवळ तात्पुरती दुरुस्ती नव्हे, तर पूर्णपणे नव्याने बांधणी करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा भविष्यात मोठी दुर्घटना घडून जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दैनिक युवक आधारने पुन्हा एकदा या गंभीर प्रश्नाकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले असून, सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून त्वरित दुरुस्तीचे आदेश द्यावेत, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होऊन तीव्र आंदोलन छेडले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.